- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : बुधवार, १६ सप्टेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २७७ | किंमत : २ रूपये


**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,५३,७०० /-
- २३ कॅरेट : १,५१,३५० /-
- चांदी : २,४८,३००/-


Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075



सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


# जरांगेंची मुंबईकडे कूच

## पाडळशिंगी टोल नाक्यावर गाड्याच गाड्या, मराठा बांधवांकडून घोषणाबाजी




**वृत्तसंस्था, जालना**
मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आपल्या मागण्यांसाठी गेल्या १७ दिवसांपासून उपोषण करत आहेत. मात्र, शासनाकडून पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नसल्याने त्यांनी आता मुंबईकडे कूच केली आहे. अंतरवाली सराटीतून आज त्यांनी आपला मोर्चा मुंबईकडे वळवला असून आझाद मैदानात ते उपोषणाला बसणार आहेत. यापूर्वी दोनवेळा मुंबई पोलिसांनी जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनाला परवानगी नाकारली. तरीही नियोजित दौऱ्यानुसार जरांगे पाटील यांनी मुंबईकडे कूच केली. दरम्यान, अंतरवाली सराटी येथून निघताना मनोज जरांगे पाटील भावूक झाले. गाडीत बसताच त्यांना अश्रू अनावर झाले. यावेळी त्यांनी समाजाच्या लेकरांसाठी लढत राहण्याचा निर्धार व्यक्त केला. जरांगे पाटील अंतरवाली सराटीमधून निघताना त्यांच्यासोबत त्यांचे मोजके समर्थक, दोन गाड्या आणि दोन रुग्णवाहिका होत्या. निघण्यापूर्वी डॉक्टरांनी त्यांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना उपचार घेण्याची विनंती केली होती, परंतु त्यांनी उपचार घेण्यास स्पष्ट नकार दिला आणि ते डिफेंडर गाडीतून मुंबईच्या दिशेने रवाना झाले. यावेळी अंतरवालीत समर्थकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

तत्पूर्वी त्यांनी समाजाच्या लेकरांपेक्षा मला मोठे काय आहे, त्यांच्या कल्याणासाठी मी जात आहे. सरकारला वाटत आहे की, मी त्यांना शरण यावे. पण समाजाच्या लेकराला अर्धवट सोडून मी समाजाला धोका देऊ शकत नाही. मला ते मारून टाकणार आहेत, म्हणून मी आझाद मैदानावर जात आहे. मी माज्या समाजाला त्रास होऊ देणार नाही.

मी लढून मरेल, असे जरांगे म्हणाले. न्यायदेवतेवर आपण विश्वास ठेवायचा आणि तीच परवानगी समजायची. माझे सगळ्यांना आवाहन आहे की, शांत राहा. तुमच्या लेकरांसाठी मी लढेन. मी जिवंत असो की नसो तुम्ही समाज मोठा करा, असे जरांगे पाटील म्हणाले. मुंबईतील आंदोलनासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या वतीने मुंबई पोलिसांकडे पुन्हा अर्ज दाखल करण्यात आला. यापूर्वी दोन वेळा परवानगी नाकारण्यात आल्यानंतर तिसऱ्यांदा अर्ज करण्यात आला. या अर्जामध्ये ५० जणांना आंदोलन करण्याची परवानगी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. नव्या अर्जात आंदोलनासाठी घालण्यात येणाऱ्या सर्व नियम आणि अटींचे पालन केले जाईल, असे नमूद केले आहे. तसेच १८ सप्टेंबर रोजी ठरवून दिलेल्या वेळेतच आंदोलन करण्यात येईल, असेही पत्रात नमूद केले आहे.

जरांगे पाटील यांना आंदोलनासाठी परवानगी मिळण्याची शक्यता कमी असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. गणेशोत्सवास परवानगी दिल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू शकतो. पोलिसांवर याचा ताण पडण्याची शक्यता असल्याने जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पोलिसांकडून परवानगी मिळण्याची शक्यता कमी आहे.

### आरक्षण घेतल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही

मी मुंबईला जात आहे. तुम्ही आशीर्वाद द्यायला या. मला मारायचे तर मारू द्या. मी आरक्षण घेतल्याशिवाय राहणार नाही. पायात आणि पोटात आग होते, असे जरांगे पाटील म्हणाले.

**जरांगेंना अश्रू अनावर**

मनोज जरांगे पाटील यांना अश्रू अनावर झाले. मी अंमलबजावणी करायला लावल्याशिवाय आता थांबणार नाही. मारू द्या मारले तर मी आझाद मैदानातच बसणार आहे, असे मनोज जरांगे यांनी सांगितले.

**सुरक्षेत वाढ**

मनोज जरांगे मुंबईच्या दिशेने रवाना झाले असून, त्यांना एसपीयू सुरक्षा देण्यात आली आहे. एसपीयू अर्थात ज्यात एक पोलिस अधिकारी आणि एक पोलिस कॉन्स्टेबल सतत मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत असणार आहेत. अंतरवाली सराटी ते मुंबईपर्यंत मनोज जरांगे यांना ही विशेष सुरक्षा असणार आहे.

**थोडक्यात**

## ट्रकची धडकेत इंजिनीअर ठार

**नाशिक :** ऐन गणेशोत्सवात नाशिक शहरात एक भीषण अपघात घडला. मुंबईनाका परिसरात भरधाव ट्रकने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने ३३ वर्षीय इंजिनीअरचा जागीच मृत्यू झाला. किरण नरोडे असे या अपघातात मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. अपघातानंतर ट्रकचालक वाहनासह घटनास्थळावरून पसार झाला. याप्रकरणी पोलिस पुढील तपास करत असून हिट अँड रनच्या वारंवार घडणाऱ्या घटनांवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, किरण नरोडे हे मॅकेनिकल इंजिनीअर म्हणून कार्यरत होते. गणरायाच्या प्रतिष्ठापनेसाठी ते कंपनीत आले होते. कंपनीतील काम आटोपून ते अंबडहून मुंबईनाक्याच्या दिशेने दुचाकीवरून जात होते. याचदरम्यान मुंबईनाका परिसरात मागून आलेल्या भरधाव ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, किरण हे रस्त्यावर कोसळले आणि गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर काही क्षणांतच ट्रकचालकाने वाहन न थांबवता घटनास्थळावरून पळ काढला. त्यामुळे परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.




# खनिजांची चोरी, गळती रोखण्यास आजपासून महाराष्ट्र सज्ज!

## महसूल विभागाने आणली गौण खनिजात डिजिटल क्रांती, 'महाखनिज २.०' प्रणालीचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण, पुढील ५ वर्षांत २५ हजार कोटी महसुलाचे उद्दिष्ट, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा विश्वास

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**
महाराष्ट्रातील गौण खनिजांचे उत्खनन, वाहतूक, परवाना आणि देखरेख प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता व कार्यक्षमता आणण्यासाठी महसूल विभागाने तयार केलेल्या 'महाखनिज २.०' या अत्याधुनिक डिजिटल प्रणालीचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंत्रिमंडळ बैठकीत करण्यात आले.

गौण खनिजांच्या व्यवस्थापनाची पारंपरिक प्रक्रिया ही मोठ्या प्रमाणात कागदी व मानवी हस्तक्षेपाची असल्याने त्यात देखरेख ठेवताना अनेक अडचणी येत होत्या; त्यावर मात करत गौण खनिज प्रशासनाला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला असून त्यांच्याच पुढाकाराने गौण खनिज प्रशासनात यामाध्यमातून डिजिटल क्रांती येत आहे. महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांनी याबद्दलचे सादरीकरण केले. कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, सहसचिव मनीषा जयभाये, रेलटेल कंपनीचे प्रमुख विनोद अग्रवाल, कोकण सहआयुक्त रवींद्र पवार उपस्थित होते.

महाखनिज प्रणालीच्या माध्यमातून गेल्या पाच वर्षांत राज्य शासनाच्या तिजोरीत सुमारे १६,००० कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे. आता महाखनिज २.० या नवीन व प्रगत आवृत्तीच्या माध्यमातून पुढील पाच वर्षांत २५,००० कोटी रुपयांचे महसूल संकलनाचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**'महाखनिज २.०' ची प्रमुख वैशिष्ट्ये व तंत्रज्ञान :**

१००% डिजिटल वाहतूक परवानाः यापुढे प्रत्यक्ष कागदी वाहतूक परवान्याची गरज भासणार नाही. QR Code आणि Barcode आधारित पूर्णपणे डिजिटल परवाना दिला जाईल, ज्यामुळे परवाना प्रक्रिया सुलभ व वेगवान होईल.

**GPS व एआयद्वारे Real-Time मॉनिटरिंग :**

खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांवर GPS, ANPR, GIS आणि GeofeQciQg द्वारे रिअल-टाईम लक्ष ठेवले जाईल. वाहनाने ठरवून दिलेल्या मार्गापेक्षा वेगळा मार्ग निवडल्यास प्रणालीद्वारे तत्काळ अलर्ट संदेश मिळतील. निर्णय प्रक्रियेला गती देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (अक) आणि व्हिडिओ अनालिटिक्सचा वापर केला जाईल.

**कोकण भवन येथे २४.७ नियंत्रण केंद्रः**

राज्यस्तरीय २४.७ कोकण भवन येथे उभारले जाणार आहे. या केंद्राद्वारे राज्यातील संपूर्ण खनिज परवाने, वाहनांची हालचाल व खाणींमधील हालचालींचे केंद्रीकृत निरीक्षण केले जाईल. यासाठी कोकण विभागाच्या विभागीय आयुक्तांची 'राज्य समन्वयक' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

**ड्रोन व LiDAR द्वारे अवैध उत्खननावर आळा :**

खाण क्षेत्रांचे अचूक मॅपिंग व मूल्यांकनासाठी Drone, LiDAR, Bnthymetric Survey आणि Remote Sensing यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे अवैध उत्खनन व अनधिकृत वाहतुकीवर कठोर वेसण घालता येणार आहे.

**स्वयंचलित दंड व ऑनलाईन पंचनामा :**

नियमभंगाच्या स्वरूपानुसार दंडाची रक्कम प्रणालीद्वारे स्वयंचलितपणे निश्चित केली जाईल. ऑनलाईन पंचनामा, नोटीस व दंड वसुलीमुळे मानवी हस्तक्षेप पूर्णपणे बंद होऊन पारदर्शकता येईल.

**इतर प्रणालींशी एकात्मिकरण :**

'महाखनिज २.०' प्रणाली ही VAHAN, महाभूलेख, Land Records, DigiLocker, BPMS, CCTV आणि Weighbridge (वजनकाटे) यांसारख्या विविध शासकीय प्रणालींशी जोडली जाणार आहे.

**नागरिक व व्यावसायिकांसाठी तक्रार निवारण :**

संबंधित नागरिक व व्यावसायिकांच्या तक्रारींचे जलद निरसन करण्यासाठी स्वतंत्र 'Grievance Redress System' आणि २४.७ कॉल सेंटर (०८०६५०७०५५५) सुरू करण्यात आले आहे. तसेच प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात Dedicated District Executive ची नेमणूक केली जाणार आहे. क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी AQdroid आणि iOS अप्लिकेशन्स उपलब्ध करून देण्यात आले असून, डिजिटल महाराष्ट्राच्या दिशेने हे एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

# पाच दिवसांपासून बेपत्ता महिलेचा मृतदेह जंगलात सापडला




**वृत्तसंस्था, जळगाव**
शहरातील रामेश्वर कॉलनीतून गेल्या पाच दिवसांपासून बेपत्ता असलेल्या महिलेचा पद्मालय जंगलात मृतदेह आढळून आल्याने संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. कविता अरुण मिस्त्री असे मृत महिलेचे नाव असून, त्यांच्या मित्रानेच दगडाने चेहरा ठेचून त्यांचा घातपात केल्याचा प्राथमिक संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणी जळगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी संशयित आरोपीला ताब्यात घेतले आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, कविता मिस्त्री या ८ सप्टेंबरपासून संशयास्पदरित्या बेपत्ता होत्या. याप्रकरणी कुटुंबीयांच्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस तपास सुरू असतानाच १३ सप्टेंबर रोजी पद्मालय जंगलात त्यांचा मृतदेह आढळून आला.

कविता मिस्त्री आणि नरेश ऊर्फ आबा अनिल सोनवणे यांच्यात मैत्रीपूर्ण संबंध होते. बेपत्ता होण्याच्या आदल्या दिवशी दोघांमध्ये जोरदार वाद झाला होता. त्यानंतर नरेशने 'दवाखान्यात घेऊन जातो' असे सांगून कविता यांना आपल्या दुचाकीवर बसवून नेले. विशेष म्हणजे, घराबाहेर पडताना कविता यांनी आपल्या मैत्रिणींना व्हिडिओ कॉल करून आपण नरेशसोबत जात असल्याचे सांगितले होते. पोलिसांनी दोन्ही मोबाईलचे लोकेशन तपासले असता म्हसावद येथे त्यांचे शेवटचे लोकेशन मिळाले, त्यानंतर दोन्ही फोन बंद झाले होते.तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी नरेश याचा माग काढला आणि त्याला जळगावातून ताब्यात घेतले.

# तरुणांचा राजकीय वापर काँग्रेसला महागात पडला!

## महसूल मंत्री व राजस्थान महापालिका निवडणूक प्रभारी चंद्रशेखर बावनकुळे यांचे मत

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**
राजस्थानमधील तरुणांचा राजकीय वापर करण्याचा काँग्रेसचा प्रयत्न जनतेने हाणून पाडला असून, 'वंदे मातरम्'पूर्ण म्हणणार नाही, अशी भूमिका घेणाऱ्या काँग्रेसला जनतेने चांगलाच धडा शिकवला आहे, असे मत राजस्थान महापालिका प्रभारी व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले. राजस्थानच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे निकाल जाहीर झाले. भाजपाने मुसंडी घेतली. त्या पार्श्वभूमीवर ते मत मांडत होते.

बावनकुळे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील विकसित भारताच्या संकल्पावर जनतेने विश्वास व्यक्त केला आहे. राजस्थानमधील तरुणांनी चुकीच्या राजकारणाला नकार देत मोदी आणि विकसित भारताच्या बाजूने कौल दिला.



राजस्थानमध्ये ३१८ नगरपालिका, नगरपरिषदा आणि महानगरपालिकांच्या निवडणुका झाल्या. त्यापैकी जवळपास २३९ नगरपालिका, महानगरपालिका आणि नगरपरिषदांमध्ये भारतीय जनता पक्षाचे बोर्ड स्थापन होणार आहेत. दहा महानगरपालिकांचा विचार केला तर आठ महानगरपालिकांमध्ये भाजपचे महापौर होणार आहेत. केवळ बिकानेर आणि अजमेर या दोन ठिकाणी भाजप थोड्या बहुमताने मागे राहिला आहे. त्यामुळे हा राजस्थानच्या जनतेचा मोठा विजय असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, प्रदेशाध्यक्ष मदन राठोड आणि राजस्थानमधील सर्व आमदार, खासदार तसेच पक्षाच्या नेत्यांच्या मेहनतीचा विजय आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकसित भारताचा संकल्प राजस्थानच्या जनतेने मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अत्यंत चांगल्या पद्धतीने निवडणुकीचे नियोजन केले. पक्षाध्यक्ष नितीन नवीन यांनी संघटनेची मजबूत रचना उभी केली. पक्षाच्या प्रभारी म्हणून योग्य दिशा देण्यात आली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मार्गदर्शन केले.

भाजप ३९ नगरपालिका, नगरपंचायती आणि महानगरपालिका मिळून २३९ ठिकाणी बोर्ड स्थापन करीत आहे. दहा कॉर्पोरेशनपैकी आठ ठिकाणी भाजपचे बोर्ड बनत आहेत. बिकानेर आणि अजमेर या दोन ठिकाणी पक्ष थोडा मागे आहे; मात्र आठ ठिकाणी बोर्ड बनत असल्याने हा राजस्थानच्या जनतेचा मोठा विजय आहे. काँग्रेसने जेनजीचा वापर करण्याचा प्रयत्न केला, मात्र तिच्या चुकीच्या नीतीला जनतेने नाकारले आणि काँग्रेसला मोठी फटकार दिली, असे बावनकुळे यांनी पुन्हा स्पष्ट केले.

**प्रीमियर कंपनीच्या जमिनीप्रकरणी एसआयटीचा अहवाल येणार**

कल्याणमधील आयकॉनिक पद्मिनी प्रकरणातील जमीनवाटपाबाबत चौकशी सुरू असून, आमदार नानाभाऊ पटोले यांनी चौकशीसाठी अर्ज केला आणि त्यानंतर चौकशी स्थापन करण्यात आल्याचा आक्षेप घेतला जात असल्याबाबत विचारले असता बावनकुळे म्हणाले की, या प्रकरणाची एसआयटी स्थापन करण्याची घोषणा आपण विधानसभेतच केली होती. प्रीमियर कंपनीच्या जमिनीशी संबंधित प्रकरणात एसआयटी नेमण्यात आली आहे. या चौकशीचा अहवाल आमच्यासमोर येईल. अहवाल आल्यानंतर नानाभाऊ पटोले यांनी विधानमंडळात जे मुद्दे मांडले होते, त्याचे स्पष्टीकरण विधानमंडळातच करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# पुढील १५ दिवस पाऊस नाहीच!

## बळीराजाची वाढणार चिंता, नागपूर वेधशाळेनं शेतकऱ्यांना दिला पावसाची वाट न पाहण्याचा सल्ला

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
राज्यभरात बळीराजा पावसाच्या प्रतिक्षेत आहे, अशातच शेतकऱ्यांची चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे, पुढची १५ दिवस विदर्भात मान्सूनच्या पावसाची कुठली शक्यता नसल्याने शेतकऱ्यांनी मान्सूनच्या पावसाची वाट न पाहता सिंचनाच्या पर्यायी उपयोजनेवर लक्ष केंद्रित करावे असा सल्ला नागपूर वेध शाळेने दिला आहे. बांगालच्या उपसनगरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला की विदर्भाला मान्सूनचा पाऊस मिळतो. मात्र सध्या पुढील काही दिवस बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याची कुठली शक्यता दिसत नसल्याची माहिती नागपूर वेध शाळेचे वैज्ञानीक प्रवीण कुमार यांनी दिली.

सध्या अल निनोचा प्रभाव कायम असून सप्टेंबर महिन्यात देखील सरासरी पेक्षा कमी पावसाची नोंद होण्याची शक्यता आहे. स्थानिक वातावरणीय परिस्थितीमुळे छोट्या छोट्या भागात पाऊस पडेल पण मान्सूनच्या सक्रिय पावसाची सध्या दोन आठवडे शक्यता नसल्याने प्रवीण कुमार यांनी सांगितले.



वैज्ञानिक, प्रवीण कुमार यांनी माहिती देताना सांगितलं की, पुढच्या काही दिवसांमध्ये पावसाची खूप कमी शक्यता आहे. कारण पुढील काही दिवस बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याची कुठली शक्यता दिसत नसल्याची माहिती आहे, पुढील ४ ते पाच दिवस पावसाची खूप कमी शक्यता आहे, सर्वत्र पावसाची कुठेही शक्यता दिसत नाहीये, पुढचे १५ दिवस पावसाची शक्यता नसल्याने आता शेतकऱ्यांनी पर्यायी मार्गांचा वापर केला पाहिजे. अल निनोचा प्रभाव दिसून येत आहे, अल निनोचा मोठ्या प्रमाणावर सक्रिय झालेला आहे.

**दुष्काळ जाहीर करा; रोहित पवारांची मागणी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सोशल मिडीयावरती पोस्ट करत म्हटलंय की, मराठवाडा, विदर्भासह राज्यभरात दुष्काळसदृश परिस्थिती आहे. अल निनोच्या पार्श्वभूमीवर सप्टेंबरदेखील कोरडाच जाण्याचा जागतिक हवामान संस्थेने गेल्या महिन्यात दिलेला अंदाज पूर्णतः खरा ठरला आहे.

सद्यस्थितीला संपूर्ण हंगाम वाया गेला असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. सध्याच्या दुष्काळाचे वास्तव अतिशय भयाण असून परिस्थिती दिवसेंदिवस भयाण होत जाणार आहे. ही सर्व परिस्थिती पाहता सरकारने आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत दुष्काळ घोषित करण्याचा निर्णय घेऊन शेतकऱ्यांना हेक्टरी किमान ५० हजार आणि शेतमजुरांना किमान २५ हजार रु. मदत घोषित करावी. सरकार आज निर्णय घेईल, ही अपेक्षा असल्याचे रोहित पवार यांनी सांगितले.

संपादकीय लेखणीतून...

# रुग्ण सुरक्षा

जागतिक रुग्ण सुरक्षा दिवस दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी जागरूकता वाढवणे आणि आरोग्य व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करणे आहे. रुग्ण सुरक्षितता हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे, कारण आरोग्य सेवांतील चुकांमुळे अनेकदा रुग्णांना हानी पोहोचू शकते. रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी औषधोपचाराच्या चुका, सर्जिकल त्रुटी, संसर्गजन्य आजारांचा फैलाव आणि निदानातील चुका यांसारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले जाते. या चुका टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना, योग्य प्रशिक्षण, आणि शिस्तबद्ध पद्धती आवश्यक आहेत. रुग्णांच्या उपचार प्रक्रियेत तंत्रज्ञानाचा योग्य वापर, प्रभावी संवाद आणि पारदर्शकता यामुळे रुग्णांची सुरक्षा सुधारता येते. जागतिक आरोग्य संघटना-डब्ल्यूएचओच्या पुढाकाराने हा दिवस साजरा केला जातो. सन २०१९ मध्ये पहिल्यांदा हा दिवस साजरा करण्यात आला. रुग्ण सुरक्षा दिवस आपल्याला हे समजावतो की प्रत्येक व्यक्तीला सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा मिळणे हक्क आहे आणि त्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न केले पाहिजेत.

रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी टिप्सः आरोग्यसेवेच्या जगात, रुग्णांच्या सुरक्षिततेपेक्षा महत्त्वाचे काहीही नाही. रुग्ण आणि त्यांच्या आरोग्यसेवा प्रदात्यामधील विश्वासू नातेसंबंधाचा हा पाया आहे. डॉक्टर, परिचारिका आणि इतर वैद्यकीय व्यावसायिक या प्रयत्नात आघाडीवर असताना, रुग्ण देखील महत्त्वाची भूमिका बजावतात. सक्रिय आणि माहितीपूर्ण राहून, तुम्ही स्वतःसाठी आणि तुमच्या प्रियजनांसाठी सुरक्षित आरोग्यसेवा अनुभवत योगदान देऊ शकता.

काळजीचा आधारस्तंभः रुग्णांची सुरक्षा- त्याच्या गाभ्यामध्ये, रुग्णांची सुरक्षा ही आरोग्यसेवा व्यवस्थेतील चुका आणि प्रतिकूल घटना रोखण्याबद्दल आहे. हा सुधारणांचा, चुकांमधून शिकण्याचा आणि सर्वोत्तम पद्धती लागू करण्याचा सततचा प्रवास आहे. आरोग्यसेवा संस्था त्यांचे सुरक्षा प्रोटोकॉल वाढवण्यासाठी सतत काम करत असताना, एक माहितीपूर्ण आणि व्यस्त रुग्ण हा संभाव्य हानीपासून बचाव करण्यासाठी सर्वात शक्तिशाली उपायांपैकी एक आहे. तुम्हाला सक्षम बनवण्यासाठी ५ सोप्या रुग्ण सुरक्षेच्या टिप्सः १) तुमच्या काळजीमध्ये सक्रिय सहभागी व्हाः प्रश्न विचारण्यास घाबरू नका. जर तुम्हाला निदान, उपचार योजना किंवा प्रक्रिया समजत नसेल तर बोला. तुम्हाला तुमच्या आरोग्यसेवेच्या प्रत्येक पैलूबद्दल जाणून घेण्याचा आणि समजून घेण्याचा अधिकार आहे. नोंदी घ्या, कुटुंबातील एखाद्या विश्वासू सदस्याला किंवा मित्राला अपॉइंटमेंटमध्ये घेऊन जा आणि तुमच्या स्थितीबद्दल लेखी माहिती विचारा. २) तुमची ओळख सत्यापित कराः हे स्पष्ट वाटू शकते, परंतु ते एक महत्त्वाचे पाऊल आहे. कोणतीही प्रक्रिया, औषधोपचार किंवा चाचणी करण्यापूर्वी, आरोग्य सेवा प्रदात्याने तुमची ओळख योग्यरित्या ओळखली आहे, याची खात्री करा. तुम्ही तुमचे नाव आणि जन्मतारीख सांगून हे करू शकता. ही सोपी कृती चुकीच्या ओळखीशी संबंधित चुका टाळण्यास मदत करते. ३) तुमचा संपूर्ण वैद्यकीय इतिहास सांगाः तुमच्या सर्व वैद्यकीय परिस्थितींबद्दल तुमच्या आरोग्य सेवा प्रदात्यांशी पारदर्शक रहा, अँलर्जी, आणि मागील शस्त्रक्रिया. तुमच्या काळजीबद्दल सुरक्षित आणि प्रभावी निर्णय घेण्यासाठी संपूर्ण आणि अचूक वैद्यकीय इतिहास आवश्यक आहे. अगदी किरकोळ दिसणारे तपशील देखील महत्त्वाचे असू शकतात. ४) तुमच्या आरोग्यसेवा टीमला जाणून घ्याः तुमची काळजी घेणाऱ्या डॉक्टर, परिचारिका आणि इतर कर्मचाऱ्यांची नावे आणि भूमिका जाणून घेण्यासाठी वेळ काढा. हे अधिक वैयक्तिक आणि जबाबदार वातावरण तयार करण्यास मदत करते आणि तुम्हाला काही चिंता असल्यास कोणाशी बोलावे? हे तुम्हाला कळते. ५) तुमच्या चिंतांबद्दल बोलाः जर काही ठीक वाटत नसेल, तर तसे सांगा. जर एखादे औषध तुम्ही आधी घेतलेल्या औषधापेक्षा वेगळे दिसत असेल, किंवा काळजीवाहक घाईघाईने किंवा विचलित दिसत असेल, तर नम्रपणे तुमच्या चिंता व्यक्त करा. तुमच्या अंतःप्रेरणा सुरक्षिततेच्या जाळ्याचा एक महत्त्वाचा भाग आहे. ६) अधिक खोलवर जाः औषध सुरक्षितता, संभाव्य चुका होण्याच्या सर्वात सामान्य क्षेत्रांपैकी एक म्हणजे औषध व्यवस्थापन आहे. येथेच तुमची दक्षता खरोखर जीव वाचवू शकते. औषध सुरक्षा ही एक सामायिक जबाबदारी आहे.

तुमची औषधे सुरक्षित आणि प्रभावी आहेत याची खात्री करण्यासाठी येथे काही विशिष्ट टिप्स आहेतः ? तुमचे प्रिस्क्रिप्शन समजून घ्याः डॉक्टरांच्या ऑफिस किंवा फार्मसीमधून बाहेर पडण्यापूर्वी, औषधाचे नाव, ते कशासाठी आहे, ते कसे घ्यावे (उदा., अन्नासोबत किंवा अन्नाशिवाय), आणि कोणते संभाव्य दुष्परिणाम आहेत याची काळजी घ्यावी हे तुम्हाला समजले आहे याची खात्री करा. या माहितीचा प्रिंटआउट मागवा. औषधांची यादी तयार कराः तुमच्या सर्व औषधांची यादी अद्ययावत ठेवा, ज्यामध्ये प्रिस्क्रिप्शन औषधे, ओव्हर-द-काउंटर औषधे, जीवनसत्त्वे आणि हर्बल सप्लिमेंट्स यांचा समावेश आहे. प्रत्येक औषधाचा डोस आणि वारंवारता समाविष्ट करा. ही यादी तुम्हाला भेटणाऱ्या प्रत्येक आरोग्य सेवा प्रदात्यासोबत शेअर करा. पाच अधिकार तपासाः कोणतेही औषध घेण्यापूर्वी, विशेषतः हॉस्पिटल किंवा क्लिनिक सेटिंगमध्ये, तुम्ही आरोग्य सेवा प्रदात्याकडे "पाच अधिकार" ची पुष्टी करावीः ? बरोबर रुग्णः ते तुमच्यासाठी आहे का? योग्य औषधः ते योग्य औषध आहे का? योग्य डोसः डोस योग्य आहे का? योग्य वेळीः ते योग्य वेळी दिले जात आहे का? योग्य मार्गः ते योग्यरित्या दिले जात आहे का (उदा. तोंडावाटे, अंतःशिराद्वारे)? सारख्या दिसणाऱ्या, आवाजात सारख्या येणाऱ्या औषधांपासून सावध रहाः बऱ्याच औषधांची नावे ऐकायला किंवा दिसायला सारखीच असतात. या औषधांबाबत विशेषतः काळजी घ्या आणि लेबल नेहमी तपासा. अँलर्जींबद्दल विचाराः कोणतेही औषध देण्यापूर्वी, तुमच्या आरोग्य सेवा प्रदात्याला तुम्हाला असलेल्या कोणत्याही औषधांच्या अँलर्जीची आठवण करून द्या. गंभीर अँलर्जीक प्रतिक्रिया टाळण्यासाठी हे एक सोपे पण महत्त्वाचे पाऊल आहे.

निष्कर्ष : रुग्णांची सुरक्षा ही केवळ एक संकल्पना नाही; ती एक सराव आहे. त्यासाठी आरोग्यसेवा पुरवठादार आणि रुग्णांमध्ये भागीदारी आवश्यक आहे. या सोप्या रुग्ण सुरक्षा टिप्स अंमलात आणून आणि औषध सुरक्षेबद्दल विशेषतः जागरूक राहून, तुम्ही तुमच्या स्वतःच्या आरोग्यसेवा संघाचा एक आवश्यक भाग बनता. तुमचा सक्रिय सहभाग चुका टाळू शकतो, परिणाम सुधारू शकतो आणि शेवटी, जीव वाचवू शकतो. लक्षात ठेवा, तुमचे आरोग्य ही तुमची सर्वात मोठी संपत्ती आहे.

# सार्वजनिक गणेशोत्सव २०२६: खगोलशास्त्रीय योगायोग, ऐतिहासिक वारसा आणि पर्यावरणपूरक सामाजिक बांधिलकी

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि धार्मिक जीवनाचा अविभाज्य भाग असलेला सार्वजनिक गणेशोत्सव यंदा १४ सप्टेंबर २०२६ पासून अत्यंत मंगलमय वातावरणात आणि अभूतपूर्व उत्साहात सुरू होत आहे. हा उत्सव आता केवळ एक पारंपरिक किंवा कौटुंबिक धार्मिक विधी राहिलेला नाही, तर समाजविज्ञान, अर्थकारण आणि मानव्यशास्त्राच्या अंगाने सखोल अभ्यास करण्याजोगा एक जागतिक स्तरावरील सांस्कृतिक महोत्सव बनला आहे. महाराष्ट्राची अस्मिता आणि लोकभावनेचा सर्वोच्च मानबिंदू असणाऱ्या या महोत्सवाची यंदाची सामाजिक, ऐतिहासिक आणि खगोलशास्त्रीय परिमाणे विशेष लक्षवेधी आहेत. यंदाच्या गणेशोत्सवाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे गणरायाचा मुक्काम नेहमीच्या दहा दिवसांऐवजी तब्बल बारा दिवसांचा असणार आहे. या दुर्मिळ खगोलशास्त्रीय योगासोबतच, महाराष्ट्र शासनाने या सणाला अधिकृतरीत्या बहाल केलेला 'राज्य महोत्सव' हा मानाचा दर्जा, या उत्सवाला ख?्या अर्थाने एका व्यापक सामाजिक व सांस्कृतिक चळवळीचे रूप प्राप्त करून देत आहे. संस्कृतीचे जतन, समाजप्रबोधन आणि आधुनिक काळातील नागरी जबाबदाऱ्या यांचा सुरेख समन्वय यातून साधला जात आहे.

यंदाच्या या प्रदीर्घ गणेशोत्सवा मागील खगोलशास्त्रीय आणि गणितीय कारणांचा वेध घेणे अत्यंत रंजक आणि अभ्यासपूर्ण आहे. पंचांग आणि ज्योतिषशास्त्राच्या सूक्ष्म कालगणनेनुसार, तिथींच्या क्षय आणि वृद्धीमुळे यंदा हा दुर्मिळ योग जुळून आला आहे. भारतीय कालगणनेत दर तीन वर्षांनी येणाऱ्या अधिक मासामुळे आणि तिथींच्या विशिष्ट चक्रामुळे, यंदा भाद्रपद शुद्ध तृतीया (हरितालिका) आणि भाद्रपद शुद्ध चतुर्थी (गणेश चतुर्थी) हे दोन्ही सण १४ सप्टेंबर रोजी एकाच दिवशी आले आहेत. साहजिकच, १४ तारखेला सुरू होणारा हा उत्सव २५ सप्टेंबरच्या अनंत चतुर्दशीपर्यंत चालणार आहे. यापूर्वी २०१७ मध्ये असा बारा दिवसांचा गणेशोत्सव आला होता आणि यानंतर थेट नऊ वर्षांनी, म्हणजेच २०३५ मध्ये हा योग पुन्हा पाहायला मिळेल. हा कोणताही चमत्कार किंवा योगायोग नसून ती एक अत्यंत अचूक अशी खगोलशास्त्रीय आणि गणितीय कालगणना आहे. या वाढीव कालावधीमुळे गणेशभक्तांना उपासनेसाठी अधिक वेळ मिळणार आहेच, पण त्याहूनही अधिक म्हणजे सार्वजनिक मंडळांना त्यांचे सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रम समाजातील तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी एक मोठी संधी उपलब्ध झाली आहे.

या महोत्सवाच्या ऐतिहासिक मुळांचे आणि त्याच्या सामाजिक उत्क्रांतीचे विश्लेषण केल्यास, सन १८९३ मध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाचे महत्त्व प्रकर्षाने अधोरेखित होते. पारतंत्र्याच्या काळात ब्रिटिश सत्तेविरुद्ध जनतेला संघटित करण्यासाठी, जाती-धर्मांच्या आणि विषमतेच्या भिंती ओलांडून सामाजिक अभिसरण घडवून आणण्यासाठी आणि वैचारिक प्रबोधनासाठी त्यांनी या उत्सवाला सार्वजनिक रूप दिले. आज शतकाहून अधिक काळ लोटल्यानंतरही हा मूळ वैचारिक वारसा जपणे आणि तो पुढील पिढीकडे सोपवणे ही काळाची गरज बनली आहे. याच ऐतिहासिक परंपरेचे जतन करत, महाराष्ट्र शासनाने यंदापासून गणेशोत्सवाला अधिकृतरीत्या 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केले आहे. या एका महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णयामुळे उत्कृष्ट गणेश मंडळांना तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावर पुरस्कार मिळतील, आंतरराष्ट्रीय स्तरावर या महोत्सवाचे ब्रँडिंग होईल आणि पारंपरिक ढोल-ताशा पथके, लेझीम, तसेच स्थानिक मूर्तिकारांना एक भक्कम आर्थिक व सांस्कृतिक व्यासपीठ उपलब्ध होईल. यातून राज्याच्या पर्यटन विकासाला आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळणार असून, हा उत्सव आता केवळ श्रद्धेचा विषय न राहता राज्याच्या प्रगतीचा एक अविभाज्य घटक बनला आहे.

बारा दिवसांचा हा प्रदीर्घ कालावधी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी एक मोठी संधी आणि तितकीच मोठी सामाजिक जबाबदारी घेऊन आला आहे. आजच्या आधुनिक आणि गुंतागुंतीच्या समाजव्यवस्थेत केवळ भव्य देखावे उभारून किंवा मनोरंजनावर भर देऊन चालणार नाही, तर मंडळांनी विधायक आणि समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करणे नितांत गरजेचे आहे. परिसरातील नागरिकांसाठी भव्य रक्तदान शिबिरे, मोफत आरोग्य तपासणी आणि गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत यांसारखे उपक्रम राबवणे ही आजच्या काळाची गरज आहे. समाजातील लोकशाही मूल्ये अधिक बळकट करण्यासाठी स्थानिक पातळीवर राबवली जाणारी मतदार जागृती आणि नोंदणी अभियाने उत्सवाची सामाजिक उंची वाढवतात. याशिवाय सायबर सुरक्षा, वाढती व्यसनाधीनता, अवयवदान आणि महिला सक्षमीकरण यांसारख्या ज्वलंत विषयांवर जनजागृतीपर अभ्यासपूर्ण व्याख्यानांचे आणि परिसंवादांचे आयोजन केल्यास, हा उत्सव खऱ्या अर्थाने समाजप्रबोधनाचे आणि लोकशिक्षणाचे एक खुले विद्यापीठ ठरू शकेल.

या विशाल महोत्सवाच्या यशस्वी आयोजनात प्रशासनाची आणि नागरी सुविधांची भूमिका अत्यंत कळीची ठरते. या प्रदीर्घ पंधरवड्यात नागरिकांची आणि लाखो भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी प्रशासनाने अत्यंत सूक्ष्म आणि चोख नियोजन केले आहे. गणेशोत्सव हा विशेषतः कोकणवासीयांच्या जिव्हाळ्याचा विषय असल्याने, गावी जाणाऱ्या हजारो चाकरमान्यांसाठी 'नमो एक्स्प्रेस' आणि जादा राज्य परिवहन बसेसचे नियोजन करण्यात आले आहे. शहरी भागातील वाढत्या गर्दीचा आणि वाहतूक कोंडीचा विचार करता, मुंबईसारख्या महानगरांमध्ये अक्वा लाईनसह (मेट्रो ३) अनेक मेट्रो मार्गांच्या वेळा रात्री १२:३० वाजेपर्यंत वाढवण्यात आल्या आहेत. सुरक्षेचे नियम आणि निकष पाळून १८ इंचांपर्यंतच्या गणेशमूर्तींना मेट्रोतून प्रवास करण्यास मुभा देण्यात आली आहे. गर्दीचे प्रभावी व्यवस्थापन आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दल अहोरात्र सज्ज असून, प्रशासनाच्या या अथक प्रयत्नांमुळे भाविकांचा प्रवास अधिक सुखकर होणार आहे. अशा वेळी, एका सुसंस्कृत समाजाचा घटक म्हणून प्रशासनाला संपूर्ण सहकार्य करणे आणि शांतता राखणे हे नागरिकांचेही परमकर्तव्य आहे.

आधुनिक काळात गणेशोत्सवासमोरील सर्वांत मोठे आव्हान आणि आपली सर्वाधिक महत्त्वाची नागरी जबाबदारी म्हणजे पर्यावरणाचा समतोल राखणे. वाढते प्रदूषण, बदलणारे हवामान आणि पर्यावरणाचा वेगाने ढासळत चाललेला समतोल पाहता, गणेशोत्सव खऱ्या अर्थाने पर्यावरणपूरक स्वरूपात साजरा होणे ही आपली निसर्गाप्रती असलेली सर्वांत मोठी कृतज्ञता ठरेल. प्लास्टर ऑफ पॅरिस आणि घातक रासायनिक रंगांच्या मूर्तींऐवजी पारंपरिक शाडूच्या मातीची किंवा कागदी लगद्याची मूर्ती स्थापन करण्यावर समाजाने भर दिला पाहिजे. मखर आणि सजावटीसाठी प्लास्टिक व थर्माकोलचा वापर पूर्णपणे टाळून कागद, पुठ्ठा, कापड, बांबू आणि पाना-फुलांसारख्या विघटनशील घटकांचा कल्पकतेने वापर वाढायला हवा. जलप्रदूषण रोखण्याच्या उद्देशाने बाप्पांचे विसर्जन थेट नैसर्गिक नद्या किंवा तलावांमध्ये करण्याऐवजी, प्रशासनाने उभारलेल्या कृत्रिम तलावांमध्येच करावे आणि निर्माल्य खतनिर्मितीसाठी योग्य ठिकाणी जमा करावे. यासोबतच, डीजेच्या कर्णकर्कश दणदणाटापेक्षा पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देऊन ध्वनिप्रदूषण टाळणे अत्यंत आवश्यक आहे. विसर्जन मिरवणुकांमध्ये कोणतीही हुल्लडबाजी न करता, शिस्तीत आणि शांततेत प्रशासनाला सहकार्य करत आनंदोत्सव साजरा केला पाहिजे. थोडक्यात सांगायचे तर, टिळकांचा प्रबोधनाचा विचार, शासनाचे पाठबळ आणि नागरिकांची पर्यावरणपूरक सामाजिक बांधिलकी यांचा त्रिवेणी संगम साधल्यास, २०२६ चा हा ऐतिहासिक गणेशोत्सव खऱ्या अर्थाने सार्थकी लागेल आणि भावी पिढ्यांसाठी तो एक आदर्श वस्तुपाठ ठरेल.

- ९५६१५९४३०६

# मैदानातील सत्ता आणि पोडियमवरील तमाशा

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

क्रिकेटच्या मैदानावर भारताने पुरुष आणि महिला दोन्ही आशिया चषकांत आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले असले, तरी मैदानाबाहेर सुरू असलेले राजकीय-प्रशासकीय नाट्य अधिक रंगले आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे (पीसीबी) अध्यक्ष आणि आशियाई क्रिकेट परिषदेचे (एसीसी) प्रमुख मोहसीन नक्वी यांचा उद्दाम अडेलतट्टूपणा आणि त्याला चोख उत्तर देणारी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाची (बीसीसीआय) पोलादी भूमिका यामुळे क्रिकेट विश्वात जोरदार चर्चा सुरू आहे.

**मैदानातील सत्ता आणि पोडियमवरील तमाशा**

दुबईच्या मैदानात भारताच्या महिला संघाने अंतिम फेरीत श्रीलंकेला ७२ धावांनी धूळ चारून विक्रमी आठव्यांदा आशिया चषकावर आपले नाव कोरले. परंतु विजेतेपद स्वीकारण्याच्या क्षणी जे घडले, त्याने पुन्हा एकदा पाकिस्तानी क्रिकेट प्रशासनाला आरसा दाखवला. पुरुष आशिया चषकामध्ये सूर्यकुमार यादवच्या संघाने घेतलेल्या भूमिकेचीच पुनरावृत्ती करत हरमनप्रीत कौरच्या महिला संघाने मोहसीन नक्वी यांच्या हातून करंडक स्वीकारण्यास थेट नकार दिला. भारताने थेट पर्याय दिले होते—एसीसीच्या उपाध्यक्षांच्या हस्ते किंवा विजयी संघाच्या बोर्ड प्रतिनिधीच्या हस्ते चषक दिला जावा. परंतु नक्वी यांच्या हट्टापुढे हे पर्याय बारगळले आणि अखेर नक्वी यांना केवळ उपविजेत्या श्रीलंकेला चेक देऊन काढता पाय घ्यावा लागला.

**नक्वींचा दुटप्पीपणा आणि फसला गेलेला डाव**

मोहसीन नक्वी हे केवळ क्रिकेट प्रशासक नसून पाकिस्तानचे गृहमंत्रीही आहेत. एका बाजूला भारताविरोधात सातत्याने राजकीय गरळ ओकायची, लष्कराचा अवमान करणारी विधाने करायची आणि दुसरीकडे क्रिकेटच्या मंचावर स्वतःचा चेहरा मिरवून आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळवण्याचा आटापिटा करायचा, हा त्यांचा दुटप्पीपणा उघड झाला आहे.

**प्रशासकीय पद विरुद्ध राजकीय अजेंडा:** क्रीडा प्रशासक म्हणून तटस्थ राहण्याऐवजी नक्वी यांनी कायम भारतद्वेषी अजेंडा राबवण्याचा प्रयत्न केला.

**पुरुषांच्या स्पर्धेतही तोंडावर आपटले:** २०२५ च्या पुरुष आशिया चषकानंतरही त्यांनी असाच पोरकट हट्ट धरला होता, ज्यामुळे चषक वितरणाचा फज्जा उडाला होता. तरीही त्यातून धडा न घेता महिलांच्या स्पर्धेत त्यांनी पुन्हा तीच चूक केली.

**आंतरराष्ट्रीय मंचावर फजिती:** दोन्ही स्पर्धांत चॅम्पियन ठरलेल्या भारतीय संघांनी नक्वी यांना मंचावर एकाकी पाडून त्यांचा अहंकार धुळीस मिळवला.

**भारताची जिद्द आणि राष्ट्रीय स्वाभिमान**

बीसीसीआय आणि भारतीय संघाची ही भूमिका उथळ हट्ट नसून देशाच्या स्वाभिमानाशी जोडलेली कणखर जिद्द आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये खेळणे ही आंतरराष्ट्रीय नियमांची पूर्तता असू शकते, पण देशाच्या सुरक्षेविरोधात कट रचणाऱ्या आणि सीमेवर रक्त सांडणाऱ्या प्रवृत्तींचा आदर करणे भारतीय



खेळाडूंना कधीच मान्य होणार नाही.

क्रिकेटच्या ताकदीच्या आणि जागतिक अर्थकारणाच्या जोरावर भारताने नक्वी यांच्या मनमानीला वेसण घातली आहे. "खेळ आम्ही आमच्या कौशल्यावर जिंकू, पण सन्मान मात्र देशाच्या अस्मितेचाच करू," हा स्पष्ट संदेश पुरुष आणि महिला अशा दोन्ही संघांनी दिला आहे. मोहसीन नक्वी यांचा अडेलतट्टूपणा स्वतःच्या वैयक्तिक प्रतिष्ठेसाठी होता, तर भारताची जिद्द राष्ट्रीय स्वाभिमानासाठी होती; म्हणूनच या लढाईत मैदानावर आणि मैदानाबाहेरही भारताचाच नैतिक व ऐतिहासिक विजय झाला आहे.

**आशियाई क्रिकेट परिषदेची कोंडी आणि 'हायब्रिड मॉडेल'चे वास्तव**

मोहसीन नक्वी यांच्या ताठर भूमिकेमुळे संपूर्ण आशियाई क्रिकेट परिषद एका विचित्र पेचात सापडली आहे. जागतिक क्रिकेटचे आर्थिक इंजिन भारत आहे आणि भारताशिवाय कोणतीही बहुराष्ट्रीय स्पर्धा आर्थिकदृष्ट्या तग धरू शकत नाही, हे उघड गुपित आहे.

**आर्थिक नाड्या भारताच्या हाती:** आशिया चषकाचे मुख्य प्रायोजक, प्रक्षेपण हक्क आणि जाहिरातींमधून मिळणारा ९० टक्क्यांहून अधिक महसूल एकट्या भारतीय बाजारपेठेतून येतो.

**हायब्रिड मॉडेलची अपरिहार्यता :** जेव्हा भारताने सुरक्षेच्या आणि राष्ट्रीय धोरणाच्या कारणास्तव पाकिस्तानात जाण्यास नकार दिला, तेव्हा नक्वी यांनी स्पर्धा रद्द करण्याची किंवा भारतावर बहिष्कार टाकण्याची पोकळ भाषा केली होती. मात्र, बीसीसीआयच्या ठाम भूमिकेपुढे लवचिक होत त्यांना सामने तटस्थ ठिकाणी हलवणे भाग पडले.

**पीसीबीची दिवाळखोरी टाळण्याची धडपड:** आशिया चषक किंवा चॅम्पियन्स ट्रॉफीसारख्या स्पर्धांमधून मिळणाऱ्या निधीवरच पीसीबीचा गाडा चालतो. भारताशी उभा दावा मांडताना आपल्याच पोटावर पाय येतोय, याचे भान नक्वी यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेने गमावले आहे.

**मैदानातील वर्चस्वः पुरुष आणि महिला संघांची बिनतोड कामगिरी**

राजनैतिक खेळी आणि पोडियमवरील ड्रामा एका बाजूला असला, तरी भारताने मैदानावर दाखवलेली निर्विवाद दादागिरी ही नक्वी यांच्या अडेलतट्टूपणाला बसलेली सर्वात मोठी चपराक ठरली.

**महिला संघाची अभेद्य भिंत:** अंतिम फेरीत फलंदाजी, फिरकी गोलंदाजी आणि चपळ क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर भारताने विरोधकांना नामोहरम केले. एका क्षणीही सामना भारताच्या हातून निसटला नाही.

**दडपणाखाली पुरुष संघाचा संयम:** पुरुष संघानेही स्पर्धेत सलग वर्चस्व राखत हे दाखवून दिले की, विरोधी रणनीती कितीही आक्रमक असली तरी भारतीय खेळाडूंचे व्यावसायिक कौशल्य आणि मानसिकता कितीतरी पट वरचढ आहे.

**शांततेतून दिलेली चपराक:** दोन्ही संघांनी मैदानावर कसलाही थयथयाट न करता केवळ आपल्या खेळाने उत्तर दिले आणि पारितोषिक सोहळ्याच्या वेळी केवळ एका मूक, कणखर नकाराने नक्वींचा संपूर्ण अहंकार मोडून काढला.

**खेळ आणि राजकारणाची मर्यादा कोणी ओलांडली?**

नेहमी 'खेळात राजकारण आणू नये' असा आव आणणाऱ्या आंतरराष्ट्रीय विश्लेषकांनाही आता वस्तुस्थिती स्पष्ट दिसत आहे. क्रिकेटचे मैदान हे स्वतःच्या राजकीय पुनर्वसनाचे व्यासपीठ बनवण्याचा पहिला गुन्हा मोहसीन नक्वी यांनी केला. पाकिस्तानच्या देशांतर्गत राजकारणात स्वतःचे वजन वाढवण्यासाठी त्यांनी क्रिकेटचा गैरवापर केला.

भारताची भूमिका मात्र 'जशास तसे' अशी कधीच नव्हती; ती केवळ आत्मसन्मानाची होती. ज्या व्यक्तीच्या राजकीय कारभारातून सीमेपलीकडून होणाऱ्या कुरापतींना बळ मिळते, त्या व्यक्तीकडून विजयाचे प्रतीक स्वीकारणे म्हणजे देशाच्या जवानांच्या बलिदानाचा अवमान ठरला असता. भारतीय खेळाडूंनी करंडक नाकारून स्पष्ट केले की, खेळाडू म्हणून ते नियमांशी बांधील आहेत, पण नागरिक म्हणून ते देशाच्या स्वाभिमानाशी तडजोड करणार नाहीत.

नक्वी यांचा हट्ट हा एका प्रशासकाचा संकुचित अहंगंड होता, तर भारताची जिद्द ही एका स्वाभिमानी महासत्तेची मर्यादा आखून देणारी ताकद होती. आंतरराष्ट्रीय मंचावर नक्वी यांच्या हातात रिकामे पोडियम उरले, तर भारताच्या खात्यात मैदानातील सोनेरी विजय आणि नैतिक श्रेष्ठता कायमची नोंदवली गेली.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# अतिदुर्गम सिरोंचा तालुक्याच्या आणखी दर्जेदार वीजपुरवठ्यासाठी तेलंगणामधून पर्यायी व्यवस्था

## संचालक धनंजय औंढेकर यांच्याकडून वीजयंत्रणेच्या कामांचा आढावा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पालकमंत्री असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम सिरोंचा तालुक्याला आणखी दर्जेदार व सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी तेलंगणा राज्यातून पयार्यी व्यवस्था तयार करण्यासाठी महापारेषण व महावितरणकडून वीजयंत्रणेची उभारणी वेगाने सुरू आहे. महावितरणचे संचालक (संचालन) धनजय औंढेकर यांनी रविवारी (दि. १३) या कामांची पाहणी केली व आढावा घेतला. गडचिरोली जिल्ह्याच्या मुख्यालयापासून सुमारे २५० किलोमीटरवर असलेला सिरोंचा तालुका हा अत्यंत दुर्गम, ऐतिहासिक आणि भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. या तालुक्याच्या पूर्वेला छत्तीसगड आणि दक्षिणेला तेलंगणा राज्य आहे.

महावितरणचे या तालुक्यात घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक, कृषी व इतर असे १३ हजार ९२८ वीजग्राहक आहेत. सिरोंचा येथे महापारेषणच्या ६६/३३ केव्ही उपकेंद्रातून महावितरणच्या ३३/११ केव्हीच्या पाच उपकेंद्रांना आणि तिथून संपूर्ण तालुक्याला सुमारे २२ मेगावॅट विजेचा पुरवठा केला जातो.

तथापि, महापारेषणच्या सिरोंचा ६६/३३ केव्ही उपकेंद्राला आलापल्ली येथील १३२/६६ केव्ही उपकेंद्रातून तब्बल ९३ किलोमीटर लांबीच्या ६६ केव्ही वीजवाहिनीद्वारे वीजपुरवठा केला जातो. जीमलगट्टाचे घनदाट जंगल, नद्या व नाल्यांमुळे पावसाळ्यात संपर्क तुटत असल्याने या वीजवाहिनीमधील बिघाड शोधणे, दुरुस्ती करणे अत्यंत जिकरीचे व खडतर आहे. या भागात संपर्काचे कोणतेही नेटवर्क नाही. त्यामुळे सुरळीत वीजपुरवठ्याच्या पर्यायी व्यवस्थेची उपाययोजना म्हणून सिरोंचा येथून ३२ किलोमीटरवर असलेल्या तेलंगणा राज्यातील किस्तमपेठ (जि. मंचेरियल) येथून सिरोंचापर्यंत ११३ टॉवर उभारून १३२ केव्ही अति उच्चदाबाच्या वीजवाहिनीचे काम महापारेषण कंपनीकडून सुरू करण्यात आले आहे. येत्या जानेवारीपर्यंत हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

सोबतच सिरोंचा येथील महापारेषणच्या ६६/३३ केव्ही उपकेंद्रांच्या ठिकाणी १३२/६६/३३ क्षमतावाढीचे काम पूर्ण झाले आहे. या कामांची रविवारी (दि. १३) संचालक (संचालन) धनजंय औंढेकर यांनी पाहणी केली व आढावा घेतला. यासोबतच महावितरणच्या उपकेंद्रांमध्ये आवश्यक नुतनीकरणाचे कामे सुरू आहेत. यात सिरोंचा ३३/११ केव्हीचे नवीन उपकेंद्र कार्यान्वित देखील झाले आहे. या उपकेंद्रात ५ एमव्हीएचे दोन पॉवर ट्रान्सफॉर्मर आहे.

तिथे ५ एमव्हीएचे आणखी एक पॉवर ट्रान्सफॉर्मर लावण्याची सूचना संचालक औंढेकर यांनी केली. यावेळी चंद्रपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता हरिश गजबे, गडचिरोलीचे अधीक्षक अभियंता प्रकाश खांडेकर व अमलेश लोणारे (महापारेषण), आलापल्ली विभागाचे कार्यकारी अभियंता जितेंद्र वाघमारे, विलास रंगारी (महापारेषण), उपकार्यकारी अभियंता भारत बालपांडे आदींची उपस्थिती होती.

सिरोंचा तालुक्याला आलापल्ली व किस्तमपेठ (तेलंगणा) या दोन्ही ठिकाणाहून वीजपुरवठ्याची सोय उपलब्ध होणार असल्याने तालुक्यातील १४० दुर्गम व अतिदुर्गम गावांतील सुमारे ७५ हजार नागरिकांना आणखी दजेर्दार वीजपुरवठ्याची सोय उपलब्ध होणार आहे. किस्तमपेठ (तेलंगणा) येथून सिंरोचा तालुक्यासाठी विजेची पयार्यी व्यवस्था झाल्यानंतर सध्याच्या सिरोंचा-आलापल्ली ६६ केव्ही वीजवाहिनीची क्षमतावाढ करून ती १३२ केव्ही करण्याचे प्रस्तावित करण्यात येणार आहे.

## ढोल-ताशांच्या गजरात मेंढल्यातील शिवमंदिर दुमदुमले!

### ऋषी पंचमीनिमित्त महाआरतीनंतर कढाव्याचा कार्यक्रम, भाविकांची मोठी उपस्थिती



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील मेंढला येथील प्राथमिक आरोग्य केंद्रालगत असलेल्या पुरातन सार्वजनिक शिव मंदिरात ऋषी पंचमीनिमित्त मंगळवारी भक्तिमय वातावरणात धार्मिक कार्यक्रम पार पडले. सकाळपासूनच मंदिरात पूजा-अर्चना व धार्मिक विधींना सुरुवात झाली होती. यामुळे संपूर्ण मंदिर परिसरात पहाटेपासूनच भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. ऋषी पंचमीनिमित्त सकाळपासून भाविकांनी सार्वजनिक शिव मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली. भगवान शिवाची विधिवत पूजा-अर्चना करण्यात आल्यानंतर सकाळी ११ वाजता ढोल-ताशांच्या गजरात आरती करण्यात आली. आरतीच्या वेळी भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने सहभाग घेतला. ढोल-ताशांचा निनाद आणि 'हर हर महादेव'च्या जयघोषाने मंदिर परिसर अक्षरशः दुमदुमून गेला.

आरतीनंतर क्रांती लक्ष्मी उत्सव मंडळाच्या सहकार्याने कढाव्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी भाविकांना कढाव्याचा प्रसाद वितरित करण्यात आला. परिसरातील महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक तसेच नागरिकांनी कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभाग घेतला. ऋषी पंचमीच्या निमित्ताने पुरातन सार्वजनिक शिव मंदिरात दिवसभर धार्मिक वातावरण पाहायला मिळाले. गावातील धार्मिक परंपरा आणि उत्सवांची संस्कृती जपण्यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले. क्रांती लक्ष्मी उत्सव मंडळाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेला कढाव्याचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. धार्मिक कार्यक्रमासाठी मंदिर परिसराची स्वच्छता व सजावट करण्यात आली होती. भाविकांनी शिस्तबद्ध पद्धतीने दर्शन घेत कार्यक्रमाचा लाभ घेतला.

## मालती (वना) घाडगे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



वर्मा ले आऊट येथील रहिवासी श्रीमती मालती (वना) घाडगे यांचे मंगळवारी १५ सप्टेंबर रोजी निधन झाले. मृत्युसमयी त्या ९१ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगा, चार मुली, आणि मोठा आप्त परिवार आहे. उद्या बुधवारी अंतिम संस्कार सकाळी १०.३० वाजता आंबाझरी घाटावर करण्यात येईल.

## प्रहार मिलिटरी स्कूल, रविनगरचे कुस्ती स्पर्धेत दमदार यश

### चार विद्यार्थ्यांची पदकांची कमाई, विभागीय स्पर्धेसाठी निवड

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मनपा स्तरावरील कुस्ती स्पर्धेत प्रहार मिलिटरी स्कूल, रविनगरच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम ठेवली. मंगळवारी, १५ सप्टेंबर रोजी कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे झालेल्या या स्पर्धेत शाळेच्या १० खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.





त्यापैकी चार विद्यार्थ्यांनी विविध वजनगटांत उत्कृष्ट कामगिरी करत पदकांची कमाई केली. १७ वर्षांखालील वयोगटात गौरव कोहाड याने ९२ किलो वजनगटात दमदार खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले. याच वयोगटातील वेदांत मते याने ६० किलो वजनगटात रौप्यपदक मिळविले. १४ वर्षांखालील वयोगटातही प्रहार मिलिटरी स्कूलच्या खेळाडूंनी आपला दबदबा कायम ठेवला. स्वस्तिक बागडे याने ४१ किलो वजनगटात प्रतिस्पर्ध्यांवर मात करत सुवर्णपदक, तर वेदांत बालबुधे याने ५७ किलो वजनगटात उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. स्पर्धेदरम्यान खेळाडूंनी आक्रमक व आत्मविश्वासपूर्ण खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्धी खेळाडूंना चितपट केले. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे पुढील विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी त्यांचा मार्ग मोकळा झाला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल प्रहार मिलिटरी स्कूलच्या प्राचार्या वंदना कुळकर्णी तसेच शाळेतील शिक्षकवृंद यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे आणि क्रीडाशिक्षक गौरव चुरागले यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी आगामी विभागीय स्पर्धेतही उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचे नाव उंचावावे, यासाठी त्यांना शुभेच्छा देत पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहित केले.

## हलबा समाज महासंघाची ५१ वी वार्षिक आमसभा २७ सप्टेंबरला

### आमसभेच्या निमित्ताने आर्ट ऑफ लिव्हिंगच्या नवचेतना शिबिराचे आयोजन, समाज बांधवांनी सहभागी होण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

हलबा समाज महासंघ, नागपूरची ५१ वी वार्षिक आमसभा रविवारी २७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता, हलबा समाज महासंघ सांस्कृतिक भवन, दीनदयाल नगर, नागपूर येथे आयोजित करण्यात आली आहे. महासंघाच्यावतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या सूचनेनुसार, निर्धारित वेळेस गणपूर्तीअभावी आमसभा तहकूब झाल्यास त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर, म्हणजेच सकाळी १०.३० वाजता, पुन्हा सभा सुरू होईल.

यावेळी गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही. त्यामुळे समाजातील सर्व सभासदांनी आमसभेला आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे. आमसभेच्या निमित्ताने नवचेतना शिबिर या आमसभेच्या निमित्ताने आर्ट ऑफ लिव्हिंग, नागपूर यांच्या सहकार्याने नवचेतना शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर रविवार, दिनांक २७ सप्टेंबर रोजी, सकाळी ९.३० ते ११.३० या वेळेत हलबा समाज महासंघ सांस्कृतिक भवन, दीनदयाल नगर, नागपूर येथे होणार आहे. ज्ञान-ध्यान-गान या संकल्पनेवर आधारित या शिबिरामध्ये तणावमुक्त जीवन, आत्मविश्वास व सर्जनशीलता वाढविणे, मानसिक शांतता व एकाग्रता सुधारणे, कौशल्य विकास तसेच निरोगी जीवनशैली यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

आर्ट ऑफ लिव्हिंगच्या या उपक्रमातून सहभागी नागरिकांना व्यावहारिक ज्ञान, श्वसन व ध्यानाच्या तंत्रांचा अनुभव आणि जीवनात सकारात्मक परिवर्तनाची प्रेरणा मिळणार आहे.

श्री श्री रविशंकर यांच्या विचारांनी प्रेरित या शिबिराचा लाभ समाजातील जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. स्वस्थ मन शांत मन आनंदमय जीवन, या संदेशासह आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन हलबा समाज महासंघाचे अध्यक्ष प्रोफेसर डॉ.देवराम नंदनवार आणि महासचिव डॉ.रमेश पराते यांनी केले आहे. असे हलबा महासंघाचे सल्लागार डॉ.अनिल नंदनवार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले.

## बजरंगनगरात महिलांनीच उभारला मंगळागौरीचा दणदणीत जल्लोष!

### नववारीतील ठसकेबाज नृत्य, उखाण्यांनी रंगली रात्र

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दक्षिण नागपूर मानेवाडा रोडवरील बजरंग नगर येथे बजरंग नगर महिला मंडळ व नवउदय वेलफेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ह्यबजरंग नगर मंगळागौरी रॉक्स ग्रुपह्णच्या वतीने मंगळागौरी उत्सव २०२६ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन, आयोजन आणि सूत्रधारपद महिलांनीच सांभाळत महिलांनी ठरवलं तर काय करू शकतात याचा दमदार प्रत्यय दिला. उत्सवासाठी महिलांनी पारंपरिक नववारी साडी परिधान करून उपस्थिती लावली. नववारीतील महिलांच्या ठसकेबाज नृत्याने कार्यक्रमस्थळी अक्षरशः जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. पारंपरिक मंगळागौरीचे खेळ, विविध सांस्कृतिक डान्स परफॉर्मन्स, उखाणे आणि महिलांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. या कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आयोजकांपासून ते व्यवस्थापना पर्यंत संपूर्ण जबाबदारी महिलांनीच यशस्वीपणे पार पारला. महिलांनी केवळ उत्सव साजरा केला नाही, तर एकत्रितपणे नियोजन करून मोठ्या प्रमाणावर कार्यक्रम उभा करून आपली संघटनशक्तीही दाखवून दिली.



कार्यक्रमाला परिसरातील मोठ्या संख्येने नागरिक व महिला उपस्थित होते. पारंपरिक संस्कृती, महिलांचा उत्साह आणि सामाजिक एकजुटीचा सुंदर संगम या मंगळागौरी उत्सवातून पाहायला मिळाला. प्रिया मुंदाफळे, मंदा सिंघनजुडे, रेखा माहोरे, संगीता सिंगनजुडे, आशा झलपुरे, संध्या मेश्राम, ताई गभने, अर्पिता भोयर, रितू रेवतकर, तृप्ती मोहर, प्रिया कोहळे, श्रद्धा भंडारे, पूजा ठाकूर, माधुरी पिंपळे, सोनाली कोहळे, मनीषा भंडारे, नीलिमा इटनकर, प्रतिभा काटे, वर्षा देशमुख आदी महिला उपस्थित होत्या. महिलांनीच आयोजन केले, महिलांनीच रंगमंच गाजवला आणि महिलांनीच मंगळागौरीचा जल्लोष केला, दक्षिण नागपूर मानेवाडा रोड बजरंग नगरचा हा उत्सव परिसरात चर्चेचा विषय ठरला.

थोडक्यात

## गृहअर्थशास्त्र विभागातर्फे आंतरराष्ट्रीय पोषण महा कार्यक्रम संपन्न



**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**

नुकताच काटोल येथील नबीरा महाविद्यालय काटोल येथे गृहअर्थशास्त्र विभागाने आंतरराष्ट्रीय पोषण महा निमित्य पोषणाचे महत्व हे शारीरिक मानसिक व बौद्धिक विकासाशी जोडलेले असते यामुळे आंतरराष्ट्रीय पोषण महानिमित्य महाराष्ट्राचा पारंपारिक खेळ फुगडी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या फुगडी स्पर्धेत महाविद्यालयातील १६ गटांनी भाग घेतला होता दोन मुलींचा प्रत्येकी एक गट याप्रमाणे ३२ मुलींचा सहभाग होता. या स्पर्धेत प्रथम क्रमांक कुमारी योगेश्री कोहळे आणि माही पटेल बी कॉम द्वितीय वर्ष द्वितीय क्रमांक प्रतिभा कावडकर आणि मनस्वी येलेकर बीए द्वितीय वर्ष आणि तृतीय क्रमांक कुमारी रुचिका भस्मे आणि चैतन्य भिसे बीएससी फायनल इयर या स्पर्धेचे परीक्षक प्रा.धनश्री रिधोरकर मायक्रोबायोलॉजी विभाग आणि प्रा. स्मिता वलोकर मॅडम कम्प्युटर लिटरसी विभाग नबीरा महाविद्यालय काटोल या होत्या. या कार्यक्रमाचे आयोजन गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दमयंती घागरगुंडे यांनी केले होते.

या कार्यक्रमाद्वारे शारीरिक स्वास्थ्याकरिता चांगल्या व योग्य पोषणाची आवश्यकता हा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमाकरिता प्रा. कल्याणी दंडारे, प्रा. मीनाक्षी राऊत, प्रा. योगिता वाडबुदे, प्रा. माधुरी तायवाडे, प्रा.शुभांगी लांबसोगे, प्रा. हर्षा हेलोंढे, प्रा.भाग्यश्री घुरडे, यांचे सहकार्य लाभले, तसेच महाविद्यालयातील विविध विभागाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक वर्ग या निमित्याने उपस्थित होते.

## प्रा .डॉ .आशिष तायवाडे यांना 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार'



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर येथील सुप्रसिद्ध मोटिवेशनल स्पीकर व प्राध्यापक आशिष तायवाडे यांना शिक्षण क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल, अकोला येथे महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस शिक्षक सेलतर्फे 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. आशिष तायवाडे हे नागपूर येथे प्राध्यापक म्हणून काम करत अस नुकताच त्यांना सहा महिन्यापूर्वी नागपूर विद्यापीठातर्फे डॉक्टर पदवी मिळाली आहे. गुणवंत विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनाकरिता ते विविध शासकीय कार्यक्रमात जात असतात. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघाचे आमदार धीरज लिंगाडे,अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण,महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस शिक्षक सेलचे अध्यक्ष प्रकाश सोनवणे यांच्या हस्ते डॉ. आशिष तायवाडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल त्यांचे नागपूर येथून बबनराव तायवाडे,दुनेश्वर पेठे, नरेश बरडे, नरेंद्र जिचकार, प्रफुल्ल गुडधे, अभिषेक धवड, सुरेश कोंगे, सुरेश जिचकार ,अंशुल जिचकार तसेच समाजातील विविध मान्यवरांनी अभिनंदन केले.

## नरसाळा येथील युवक यश जगदीश गजभिये यांची आज महसूल सहाय्यकपदी निवड



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

तारसा - धामणगाव जिल्हा परिषद क्षेत्रातील व गट ग्रामपंचायत नरसाळा अंतर्गत येणाऱ्या नरसाळा येथील युवक यश जगदीश गजभिये यांची आज मंगळवार (ता. १५ सप्टेंबर) ला एमपीएससी स्पर्धा परीक्षेतून महसूल सहाय्यक पदी निवड झाली. यश गजभिये यांनी घेतलेल्या कठीण परिश्रम व चिकाटीमुळे त्यांना यश आल्याने, गावकऱ्यांनी आज त्यांच्या नरसाळा येथील राहत्या घरी जाऊन त्यांच्या गळ्यात फुलांच्या हार टाकून व गुलाल लावून त्यांचे स्वागत करून अभिनंदन केले व पुढील वाटचाली करिता शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य परसराम घारड, अश्विन मेश्राम, नामदेव ठाकरे, दीपक गजभिये, अविनाश वाहने, सुरेश मेश्राम, मोतीराम गजभिये सह ग्रामस्थ उपस्थित होते.

## भिवापूर महाविद्यालयात बुधवारी भव्य रक्तदान शिबिर

### पोलीस स्टेशन, गणेश उत्सव मंडळासह विविध संघटनांचा पुढाकार

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी जपत शहर व तालुक्यातील सर्व गणेश उत्सव मंडळ, पोलीस स्टेशन यांच्या पुढाकारातून बुधवार, १६ सप्टेंबर रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. भिवापूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्रसेना, पोलीस पाटील संघटना, भिवापूर तालुका पत्रकार संघ व शांतता समिती, सर्व भिवापूर युवा संघटना तसेच भिवापूर महाविद्यालय आजी-माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर होणार आहे. भिवापूर महाविद्यालय, भिवापूर येथे सकाळी ९.३० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत रक्तदान शिबिर सुरू राहणार आहे. या शिबिरासाठी जीवन ज्योती ब्लड बँक अँड कॉम्पोनंट्स यांचे सहकार्य लाभणार आहे. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक उपक्रमांनाही चालना देणारा ठरावा, या उद्देशाने विविध सामाजिक, शैक्षणिक, प्रशासकीय आणि युवा संघटनांनी एकत्र येत रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, यासाठी रक्तदानासारख्या उपक्रमांचे महत्त्व मोठे आहे. त्यामुळे नागरिक, युवक, विद्यार्थी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी या शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

थोडक्यात

## महाराष्ट्रात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या, संभाजी ब्रिगेडची मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील पावसाअभावी गंभीर बनलेल्या परिस्थितीची तातडीने दखल घेऊन महाराष्ट्रात कोरडा दुष्काळ जाहीर करावा आणि संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, या प्रमुख मागणीसाठी संभाजी ब्रिगेड नागपूर महानगर च्यावतीने नागपूर निवासी जिल्हाधिकारी अनुप खांदे साहेब यांना निवेदन देण्यात आले. मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील शेतकरी सध्या मोठ्या संकटातून जात आहे. पावसाने सातत्याने ओढ दिल्यामुळे खरीप पिके करपण्याच्या स्थितीत आहेत.

पिकांचे उत्पादन हातात येण्याची शक्यता कमी झाल्याने शेतकऱ्यांचे संपूर्ण आर्थिक गणित कोलमडले आहे. त्यामुळे शासनाने केवळ परिस्थितीचा आढावा न घेता तातडीने ठोस निर्णय घेऊन शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे. अनेक शेतकऱ्यांनी खरीप पेरणीसाठी बँका, पतपुरवठा संस्था तसेच खासगी सावकारांकडून कर्ज घेतले आहे. मात्र पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पाऊस न झाल्याने कर्जफेडीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे शासनाने परिस्थितीचे तातडीने मूल्यांकन करून मदतीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

## विज्ञान नाट्योत्सवात चाचेर शाळेचे यश

### तालुकास्तरीय स्पर्धेत सहावी ते दहावी गटातून द्वितीय क्रमांक



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

तालुकास्तरीय विज्ञान नाट्योत्सव २०२६-२७ स्पर्धेत पीएमश्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, चाचेरच्या विद्यार्थ्यांनी नुकतेच उल्लेखनीय यश संपादन केले. मौदा तालुक्यातील सहावी ते दहावी गटातून शाळेने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या उल्लेखनीय यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जीवन सहारे, उपाध्यक्ष शुभांगी आंबीलढूके, माजी अध्यक्ष किरण बरबटे व सदस्य प्रफुल बादोले यांनी विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना या स्पर्धेसाठी मुख्याध्यापक अनिल गडपायले, शिक्षकवृंद रवींद्र घुगे,शेख व वैद्य यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांनी विज्ञानविषयक संकल्पना प्रभावी नाट्यरूपाने सादर करून परीक्षकांची दाद मिळवली.

याप्रसंगी शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका साखरकर, बालकोटे, खंगार, उक्कुडे, खंडात व निमजे यांची उपस्थिती होती. शाळेच्या या यशाबद्दल शिक्षक, विद्यार्थी व पालकवर्गातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, विज्ञान नाट्योत्सवातील हे यश शाळेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक वाटचालीतील महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.

## यशोदा केंद्रांतर्गत मुख्याध्यापकांची आढावा सभा उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

यशोदा केंद्रांतर्गत मराठी माध्यम व इंग्रजी माध्यमाच्या सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांची विविध शैक्षणिक विषय व उपक्रमांवर आधारित आढावा सभा १५ सप्टेंबर रोजी यशोदा प्राथमिक शाळा, त्रिमूर्ती नगर, नागपूर येथे उत्साहात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद नागपूरचे वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोज पाटील होते. यावेळी अशोक डोहे , व .R.C.-1, कबीर मेश्राम, विस्तार अधिकारी उमरेड, अभिजित राऊत, समन्वयक, हर्षाली खर्चे, संचालिका Snik Foundationतसेच सारिका दहापुते, विशेष शिक्षिका यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अभिजित राऊत यांनी दिव्यांग प्रवर्गाची ओळख या विषयावर मार्गदर्शन केले. हर्षाली खर्चे यांनी दिव्यांग मुलांच्या दैनंदिन व्यवहारातील अडचणी, त्यांच्याशी संवेदनशीलपणे कसा व्यवहार करावा आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी शाळांनी कोणती भूमिका घ्यावी, याबाबत मार्गदर्शन केले. त्या गेल्या १५ वर्षांपासून दिव्यांग मुलांच्या पुनर्वसनासाठी कार्यरत आहेत.

तसेच सारिका दहापुते यांनी मासिक पाळी व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करून विद्यार्थिनींच्या आरोग्य, स्वच्छता आणि योग्य जनजागृतीचे महत्त्व स्पष्ट केले. सभेत शाळांमधील शैक्षणिक कामकाज, विविध उपक्रमांची अंमलबजावणी, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास तसेच शैक्षणिक गुणवत्तावाढीच्या दृष्टीने विविध विषयांवर चर्चा व आढावा घेण्यात आला. मान्यवरांच्या मार्गदर्शनामुळे उपस्थित मुख्याध्यापकांना विद्यार्थ्यांच्या विविध गरजा समजून घेऊन शाळास्तरावर प्रभावी उपक्रम राबविण्यासाठी नवी दिशा मिळाली. आढावा सभेचे आयोजन बेलसरे मॅडम केंद्रप्रमुख तथा मुख्याध्यापिका यशोदा प्राथमिक शाळा यांनी केले प्रस्तावना व संचालन शरद उरकुडे तर आभार प्रदर्शन नारनवरे यांनी केले.

# गोंडवाना विद्यापीठातील नक्षल नेता भूपतीच्या कथित नियुक्तीवरून खळबळ

### माजी जहाल माओवादी नेता भूपतीच्या कथित नियुक्तीचा आरोप, कुलगुरूंच्या भूमिकेचीही चौकशी करण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

गडचिरोलीतील गोंडवाना विद्यापीठातील एका कथित नियुक्तीच्या मुद्द्यावरून राजकीय व सामाजिक वर्तुळात खळबळ उडाली आहे. माजी जहाल माओवादी नेता वेणुगोपाल राव उर्फ भूपती यांच्याशी संबंधित व्यक्तीची विद्यापीठात समन्वयक पदावर नियुक्ती करण्यात आल्याचा आरोप करत या नियुक्तीची तातडीने चौकशी करावी, अशी मागणी आदिवासी विकास संघाच्या वतीने मंगळवारी झालेल्या पत्रकार परिषदेत करण्यात आली.

या प्रकरणात गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रशांत बोकारे यांना पदावरून दूर करून नियुक्ती रद्द करावी, अशी मागणीही पत्रकार परिषदेत करण्यात आली. मात्र संबंधित नियुक्तीबाबतचे आरोप व त्यामागील तथ्य यांची अधिकृत स्वतंत्र पुष्टी होणे बाकी आहे.



**२८ सप्टेंबरला धडक मोर्चाचा इशारा**

गडचिरोली जिल्ह्यातील विविध प्रश्नांबाबत शासनाकडे वारंवार निवेदने, मोर्चे, धरणे, घेराव, उपोषणे आणि आंदोलने करूनही अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याचा आरोप संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केला. मागण्यांची तातडीने पूर्तता न झाल्यास २८ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्ह्यात धडक मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

**आदिवासी विकास विभागावरही निशाणा**

पत्रकार परिषदेत आदिवासी विकास विभागाच्या कामकाजावरही जोरदार टीका करण्यात आली. आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली. तसेच आदिवासी विभागातील काही वरिष्ठ अधिकारी व प्रकल्प अधिकाऱ्यांवरही विविध आरोप करून त्यांच्या विरोधात चौकशी व निलंबनाची मागणी करण्यात आली.

**वनहक्क पट्टे, आश्रमशाळा आणि वसतिगृहांचे प्रश्न**

जिल्ह्यातील आदिवासी व पारंपरिक वननिवासींच्या वनजमिनीवरील अतिक्रमणांचे दावे तपासून पात्र लाभार्थ्यांना वनहक्काचे पट्टे सरसकट देण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली.

एकलव्य विद्यालये, केंद्रीय विद्यालये आणि आश्रमशाळांच्या इमारत बांधकामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासणी करण्याची मागणी करण्यात आली. आश्रमशाळांना निकृष्ट दर्जाचे धान्य व ड्रेस पुरवठा करणाऱ्यांवर कारवाई करावी, तसेच आश्रमशाळा व वसतिगृहांची नियमित तपासणी करून शैक्षणिक दर्जा सुधारावा, अशी मागणीही करण्यात आली. वसतिगृहातील डीबीटी योजना बंद करून पूर्वीप्रमाणे मेस पद्धत सुरू करावी, तसेच न्यूक्लिअस बजेटच्या निधीत वाढ करावी, अशी मागणी करण्यात आली.

**वनव्यवस्थापन समितीच्या निधीच्या चौकशीची मागणी**

वडसा वन विभागातील संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या निधीच्या व्यवहारात गैरव्यवहार झाल्याचा आरोप करून संबंधित प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. त्याचबरोबर जिल्ह्यातील हत्तींच्या वाढत्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली.

**स्मार्ट मीटर, जड वाहतूक आणि रोजगाराचाही मुद्दा**

गडचिरोली जिल्ह्यातील वीज ग्राहकांना स्मार्ट मीटरचा कथित त्रास होत असल्याचे सांगत स्मार्ट मीटर बसविणे थांबवून जुने मीटर कायम ठेवावेत, अशी मागणी करण्यात आली.

गडचिरोली जिल्ह्यातून छत्तीसगडकडे जाणारी जड वाहतूक तातडीने बंद करावी, तसेच जिल्ह्यातील बेरोजगार युवकांसाठी वनाधारित उद्योग उभारावेत, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. याशिवाय आदिवासी नागरिकांवर कलम ११० अंतर्गत सुरू असलेली कार्यवाही थांबवावी, अशी मागणी करण्यात आली. राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या माध्यमातून सुरू असलेल्या कामांचा दर्जा सुधारून कामे वेळेत पूर्ण करावीत, अशीही मागणी करण्यात आली.

**मागण्या मान्य करा, अन्यथा आंदोलन**

जिल्ह्यातील विविध प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावेत. अन्यथा २८ सप्टेंबरचा धडक मोर्चा अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा पत्रकार परिषदेत देण्यात आला.

पत्रकार परिषदेला आदिवासी विकास संघाचे गडचिरोली अध्यक्ष विलास नरोटे, जिल्हा महासभेचे सचिव तसेच विदर्भातील संघटनेचे सरसेनापती नंदुभाऊ नरोटे उपस्थित होते. त्यांनी शासनाने जिल्ह्यातील आदिवासी व सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी केली.

## खड्ड्यांत महामार्ग; प्रशासनाला दोन दिवसांचा अल्टिमेटम!

### उमरेड-भिवापूर मार्गाच्या दुरवस्थेवर माजी आमदार सुधीर पारवेंचा संताप, चौपदरीकरणाचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

विकासाच्या गप्पा मारणाऱ्या प्रशासनाच्या नाकावर टिच्चून उमरेड-भिवापूर राष्ट्रीय महामार्गाची दुरवस्था वाहनचालकांच्या जीवावर उठली आहे. ३५३ डी महामार्गावरील उमरेड ते भिवापूर या सुमारे २२ किलोमीटरच्या मार्गावर ठिकठिकाणी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे अपघातांचे सत्र सुरू असून, विशेषतः दुचाकीस्वारांसाठी हा मार्ग अक्षरशः जीवघेणा ठरत आहे. या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष देत माजी आमदार सुधीर पारवे यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला धारेवर धरले आहे.

उमरेड येथील भिवापूर नाक्याजवळ १४ सप्टेंबर रोजी सकाळी झालेल्या भीषण अपघातात भाऊ-बहीण जखमी



झाले. या दुर्घटनेत भावाचा जागीच मृत्यू झाला, तर बहिणीवर उपचार सुरू आहेत. या घटनेच्या पार्श्वभूमीवर महामार्गावरील खड्ड्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या नावाखाली केवळ वरवरची मलमपट्टी न करता दर्जेदार दुरुस्ती करावी, अशी मागणी पारवे यांनी केली.

यासंदर्भात पारवे यांनी राष्ट्रीय महामार्ग ३५३ डीच्या उमरेड-भिवापूर-नागभीड विभागाचे प्रकल्प संचालक अभिजित जिचकार यांची भेट घेऊन निवेदन दिले. खड्डे दोन दिवसांत दर्जेदार पद्धतीने बुजवून सुरक्षित वाहतूक सुनिश्चित करा, अन्यथा विभागाविरोधात आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला.

**चौपदरीकरण कागदावर नको!**

उमरेड-भिवापूर मार्गाचे चौपदरीकरण तातडीने सुरू करण्याची मागणीही पारवे यांनी केली आहे. दिवसेंदिवस वाढणारी वाहतूक, रस्त्याची दुरवस्था आणि वारंवार होणारे अपघात पाहता चौपदरीकरणाची केवळ चर्चा करून भागणार नाही. प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणे गरजेचे आहे. महामार्ग खड्ड्यांत आणि नागरिकांचे जीव धोक्यात असताना प्रशासन आणखी किती अपघातांची वाट पाहणार? असा सवाल या निमित्ताने उपस्थित झाला आहे. खड्ड्यांमुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून, पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे. महामार्गावरील धोकादायक खड्डे तातडीने बुजविणे आणि चौपदरीकरणाचे काम वेगाने मार्गी लावणे, ही आता केवळ विकासाची नव्हे तर नागरिकांच्या जीविताच्या सुरक्षेची गरज बनली आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी ग्रुपचा मंगळागौर स्पर्धेत प्रथम क्रमांक



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नवभारत आणि एंजल लेडीज क्लबच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रंगीला सावन उत्सव - मंगळागौर स्पर्धेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी ग्रुपने प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. दिनांक ९ सप्टेंबर २०२६ रोजी, अमृत भवन, नागपूर येथे ही स्पर्धा उत्साहात पार पडली. महाराष्ट्रीय संस्कृती, परंपरा, लोककला आणि मंगळागौरीच्या विविध पारंपरिक खेळांचे सुंदर सादरीकरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी ग्रुपच्या महिलांनी केले. पारंपरिक वेशभूषा, आकर्षक सादरीकरण, सांघिक सहभाग आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन यामुळे परीक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेत ग्रुपने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या विजयी ग्रुपमध्ये मीनाक्षी लोही, ज्योती कापडे, तेजस्विनी शेकार, अर्चना बुधे, संगीता खुजे, रोहिणी अवजे, कांचन टेकाडे, दीक्षा चावटकर, काजल चावटकर, कामिनी तवले, अश्विनी उरकुडे आणि संजीवनी घुरडे यांचा सहभाग होता. या यशाबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी ग्रुपच्या सर्व सदस्यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत असून, महाराष्ट्रीय संस्कृती व परंपरा जपण्याच्या त्यांच्या कार्याचे कौतुक केले जात आहे.

# नांद येथील अतिक्रमण कारवाईला जातीय रंग देण्याचा डाव : सरपंच शितल राजूरकर

### आदिवासींना बेघर केले जात असल्याचा आरोप निराधार, सरपंच राजूरकर यांचे पत्रपरिषदेत स्पष्टीकरण

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

सरकारी आणि ग्रामपंचायतीच्या मालकीच्या सार्वजनिक जमिनीवरील अतिक्रमणे हटविण्याची कारवाई नियमांच्या चौकटीतच सुरू आहे. या कारवाईत आदिवासींना बेघर केले जात असल्याचा आरोप पूर्णतः निराधार असून, काही स्वयंघोषित नेत्यांकडून अतिक्रमण कारवाईला जाणीवपूर्वक जातीय रंग देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप नांदच्या सरपंच शितल राजूरकर यांनी पत्रपरिषदेत केला. गावाच्या सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

नांद येथील सर्वे क्रमांक १२ व १३ मधील काही भागावर अतिक्रमण झाल्याचा दावा ग्रामपंचायतकडून करण्यात



आला. सर्वे क्रमांक १२ मध्ये गुरे उभे करण्याची जागा, स्थायी कच्चा रस्ता आणि झुडपी जंगलाची नोंद आहे. तर सर्वे क्रमांक १३ मध्ये शौचासाठी राखीव जागा व झुडपी जंगलाची नोंद असून, याच परिसरात पूर्वापार स्मशानभूमी असल्याचे ग्रामपंचायतीचे म्हणणे आहे. या दोन्ही सर्वे क्रमांकांमधून सुमारे १०० फूट रुंदीचा सार्वजनिक रस्ता असून, त्याची नोंद नकाशात तसेच सात-बारा उताऱ्यावर असल्याचे सरपंच शितल राजूरकर यांनी पत्रपरिषदेत सांगितले. पत्रपरिषदेला सचिव नन्नावरे, उपसरपंच मोहन धारणे, ग्रा.पं. सदस्य विजय रामटेके, आशिष शिवरकर, रवींद्र धाडसे, सदस्या ज्योती बांगरी, तेजवंता देवके उपस्थित होते.

**रस्ता, स्मशानभूमीची जागा वाचविण्यासाठी कारवाई**

सार्वजनिक रस्ता, स्मशानभूमी तसेच भविष्यातील शासकीय व सार्वजनिक सुविधांसाठी आवश्यक असलेली जागा अतिक्रमणमुक्त ठेवणे गरजेचे आहे. सरकारी जमिनीवर आज अतिक्रमण झाले आणि त्याकडे दुर्लक्ष केले, तर उद्या रस्ते, स्मशानभूमी व इतर मूलभूत सुविधांसाठी जागाच उरणार नाही. त्यामुळे अतिक्रमण हटविण्याची भूमिका घेतल्याचे ग्रामपंचायतीकडून स्पष्ट करण्यात आले.

ग्रामपंचायतीने संबंधित अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावल्या आहेत. संबंधितांची गावातील आबादी परिसरात पक्की घरे असल्याचेही सरपंचांनी सांगितले. नोटिसा देण्यापूर्वी संबंधित जागेवर कोणीही वास्तव्यास नव्हते. गोठा आणि शेतीचे साहित्य ठेवण्यासाठी झोपड्यांचा वापर होत होता. मात्र, नोटिसा बजावल्यानंतर काही जण तेथे वास्तव्यास आल्याचा दावा यावेळी केला.

**जात पाहून कारवाई केली नाही**

अतिक्रमण कारवाईच्या यादीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच इतर मागासवर्गीयांचाही समावेश आहे. त्यामुळे केवळ विशिष्ट समाजाला लक्ष्य करून कारवाई केली जात असल्याचा आरोप चुकीचा आहे. काही बाहेरचे स्वयंघोषित नेते ग्रामपंचायतीला बदनाम करण्यासाठी कारवाईला जातीय रंग देत असल्याचा आरोप सरपंच शितल राजूरकर, उपसरपंच मोहन घरत आणि उपस्थित ग्रामपंचायत सदस्यांनी केला.

अतिक्रमण हटविण्याबाबत ग्रामपंचायतीने १२ ऑगस्ट रोजी तहसीलदारांना माहिती दिली होती. त्यानंतर १८ ऑगस्ट रोजी तहसीलदारांनी भिवापूर पोलिसांना कारवाईच्या वेळी बंदोबस्त देण्याचे आदेश दिले. त्यानुसार २७ ऑगस्ट रोजी अतिक्रमण हटविण्याची कारवाई प्रस्तावित करण्यात आली होती. मात्र, स्थानिक अतिक्रमणधारकांच्या विनंतीचा विचार करून अतिक्रमित साहित्य स्वतःहून हटविण्यासाठी ग्रामपंचायतीने १५ दिवसांची मुदतवाढ दिली आहे. ग्रामपंचायतीला कायद्याने दिलेल्या अधिकारांतर्गतच ही कारवाई केली जात असून, ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ५३ नुसार अतिक्रमण हटविण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

**सार्वजनिक जमीन कोणासाठी?**

सरकारी आणि ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जमिनीवर अतिक्रमण वाढत गेले तर भविष्यात गावाच्या विकासासाठीच जागा शिल्लक राहणार नाही. त्यामुळे हा विषय कोणत्या जातीचा किंवा समाजाचा नसून गावाच्या सार्वजनिक मालमत्तेचा आहे, अशी भूमिका ग्रामपंचायतीने घेतली आहे. नियमबाह्य अतिक्रमणांना संरक्षण देण्याऐवजी सार्वजनिक जमिनीचे रक्षण करण्याची जबाबदारी पार पाडली जात असल्याचे सरपंच राजूरकर यांनी यावेळी ठणकावून सांगितले.

थोडक्यात

## आत्महत्या प्रतिबंधासाठी संवादाची सुरुवात करूया

### जिल्हा रुग्णालयात जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त आत्महत्या प्रतिबंध आणि मानसिक आरोग्याबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने जिल्हा रुग्णालय, नागपूर येथे विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निवृत्ती राठोड यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला. यावर्षीच्या जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाची 'आत्महत्येबाबतचा दृष्टीकोन बदलूया, संवादाची सुरुवात करूया' ही संकल्पना असून, त्याअनुषंगाने मानसिक आरोग्य आणि आत्महत्या प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमास अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन गुल्हाने, अधिसेविका वंदना बरडे, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. देशमुख, डॉ. स्नेहल निंभोरकर आणि डॉ. अनघा सिन्हा यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मानसिक आरोग्याचे महत्त्व, आत्महत्येचे विचार येत असलेल्या व्यक्तीशी संवेदनशीलपणे संवाद साधणे, त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे तसेच गरजेनुसार वेळेवर वैद्यकीय व मानसोपचारविषयक मदत उपलब्ध करून देणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. 'बोलूया, ऐकूया आणि मदतीचा हात देऊया' हा सकारात्मक संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमादरम्यान अधिसेविका वंदना बरडे यांनी उपस्थितांना आत्महत्या प्रतिबंध व मानसिक आरोग्य जनजागृतीबाबतची शपथ दिली. समाजात मानसिक आरोग्याबाबत खुलेपणाने संवाद वाढविणे आणि गरजू व्यक्तींना योग्य वेळी मदत मिळवून देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आत्महत्या प्रतिबंध दिनाचा संदेश अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवून त्याचा प्रचार व प्रसार करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी योगिता डायगव्हाणे, कादंबिनी तिरपुडे आणि तेजस्विनी मेहरे यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिखा यांनी केले, तर मनोरुग्णतज्ज्ञ परिचारिका चंदा वरखडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपस्थित अधिकारी, डॉक्टर, अधिपरिचारिका. परिचारिका प्रभारी परिचारिका व कर्मचाऱ्यांचे यांनी परिश्रम घेतले.

## डाक जीवन विमा योजनेत पेट अभिकर्त्यांची भरती

### नागपूर ग्रामीण, भंडारा व गोंदिया जिल्ह्यांसाठी इच्छुकांकडून अर्ज मागविले

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
भारतीय डाक विभागाच्या डाक जीवन विमा योजनेअंतर्गत नागपूर ग्रामीण, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांसाठी पेट अभिकर्ता नियुक्त करण्यात येणार आहेत. यासाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले असून, अर्जाचा नमुना जवळच्या डाक कार्यालयात उपलब्ध आहे. पेट अभिकर्ता पदासाठी उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे असावे आणि शैक्षणिक पात्रता किमान दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. बेरोजगार किंवा स्वयंरोजगारित शिक्षित युवक, माजी जीवन विमा सल्लागार, विमा कंपन्यांचे माजी एजंट, माजी सैनिक, अंगणवाडी सेविका, महिला मंडळ सेविका तसेच सेवानिवृत्त शिक्षक आदी उमेदवार अर्ज करू शकतात. मात्र, अर्जदार सध्या अन्य कोणत्याही विमा कंपनीचा एजंट नसावा. उमेदवारांची निवड थेट मुलाखतीद्वारे केली जाणार असून, व्यावसायिक कौशल्य, व्यक्तिमत्त्व, परस्पर संबंधाचे कौशल्य आणि जीवन विम्याबाबतचे ज्ञान या बाबींचा विचार केला जाणार आहे. निवड झालेल्या उमेदवारास ५ हजार रुपयांची अनामत रक्कम सुरक्षा ठेव म्हणून जमा करावी लागेल. ही रक्कम एनएससी अथवा केव्हीपी स्वरूपात ठेवण्यात येईल. निवडीनंतर उमेदवारास इन्शुरन्स इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाची परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक असून, ही परीक्षा निवड झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत उत्तीर्ण करावी लागेल. त्यानंतर परवाना देण्यात येईल. निवड झालेल्या अभिकर्त्यांना टपाल विभागाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येणारे कमिशन दिले जाईल. इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज प्रवर अधीक्षक, नागपूर ग्रामीण विभाग, तिसरा मजला, सिटी पोस्ट ऑफिस, इतवारी, नागपूर-४४०००२ यांच्या नावे स्पीड पोस्टद्वारे २३ सप्टेंबरपर्यंत पाठवावा. अर्जदारांची मुलाखत २८ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता कामठी हेड पोस्ट ऑफिस, भंडारा पोस्ट ऑफिस आणि गोंदिया पोस्ट ऑफिस येथे घेण्यात येणार आहे. उमेदवारांनी आवश्यक शैक्षणिक प्रमाणपत्रे, पॅनकार्ड, आधारकार्ड आणि अन्य संबंधित कागदपत्रांसह उपस्थित राहावे. दहावी किंवा बारावीचे बोर्ड प्रमाणपत्र, जन्मतारखेचा पुरावा, पॅनकार्ड व आधारकार्डच्या प्रती तसेच संगणक ज्ञानाचे प्रमाणपत्र (असल्यास) अजासोबत जोडणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी जवळच्या डाक कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा महाराष्ट्र डाक विभागाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी. ही नियुक्ती सरकारी नोकरीच्या स्वरूपाची नसल्याचे डाक विभागाने स्पष्ट केले आहे.

## लातूर पोलिस दलाच्या श्वान पथकात 'शक्ती'चे आगमन

**लातूर :** लातूर पोलीस दलाच्या श्वान पथकाच्या क्षमतेत आणखी एक महत्त्वाची भर पडली असून, बेल्जियन मॅलिनॉइस जातीचा ह्यशक्तीह्न हा श्वान लातूर पोलीस दलात दाखल झाला आहे. लातूर पोलीस दलाच्या श्वान पथकाची स्थापना सन २००७ मध्ये झाल्यापासून प्रथमच या जातीचा श्वान पथकात दाखल झाला आहे. स्फोटक पदार्थांचा शोध घेण्यासाठी शक्तीला विशेष प्रशिक्षण देण्यात येणार असून, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर तो लातूर जिल्ह्यातील सुरक्षा व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

# चिचोली, भानेगाव, चनकापूर ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

## संयुक्त नगरपरिषदेच्या स्थापनेवर प्रश्नचिन्ह?

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**
चिचोली, भानेगाव आणि चनकापूर या तीन ग्रामपंचायतींचे विलीनीकरण करून संयुक्त नगरपरिषद स्थापन करण्याचा बहुचर्चित प्रस्ताव नगरविकास मंत्रालयात अडकला आहे तर दुसरीकडे ८ सप्टेंबर २०२६ मंगळवारला या तीनही ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांचे आरक्षण जाहीर झाले आहे त्यामुळे प्रस्तावित नगरपरिषदेच्या निर्मितीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून परिसरात आता पुन्हा एकदा ग्रामपंचायत निवडणुकीचे ढोल-ताशे वाजण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

राज्याचे महसूलमंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी या भागाच्या विकास करण्याच्या दृष्टीकोनातून संयुक्त नगरपरिषद करण्याचे आश्वासन दिले होते त्यानुसार जिल्हाधिकाऱ्या मार्फत ५ मे २०२५ रोजी हा प्रस्ताव नगरविकास मंत्रालयाकडे सादर करण्यात आला होता परंतु सदर प्रस्ताव थंडबस्त्यात पडल्याने राजकीय पेच निर्माण झाला आहे. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ येथे विलास महल्ले यांनी याचिका दाखल करण्यात आली होती. न्यायालयाने ८ ऑक्टोबर २०२५ रोजी नगरविकास मंत्रालयाला महल्ले यांच्या अर्जावर आठ




आठवड्यांच्या आत निर्णय घेण्याचे आदेश दिले होते. मात्र मुदत संपून महिने उलटले तरी नगरविकास मंत्रालयाने याबाबत कोणताही अंतिम निर्णय घेतला नाही.

यादरम्यान निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत निवडणुकांच्या बाबत निर्णय घेतला ८ सप्टेंबर २०२६ मंगळवार रोजी सरपंच पदाचे आरक्षण जाहिर करण्यात आले चिचोली व भानेगाव ग्रामपंचायतीचे सरपंच पद अनुसूचित जमाती (खुला) प्रवर्गासाठी तर चनकापूरचे सरपंच पद सर्वसाधारण गटासाठी आरक्षित करण्यात आले आहे.

चनकापूर ग्रामपंचायतचा कार्यकाळ फेब्रुवारी २०२६ मध्ये संपला आहे याठिकाणी प्रशासकाला सहा महिन्या करिता मुदतवाढ देण्यात आली आहे तर चिचोली व भानेगावचा ग्रामपंचायत चा कार्यकाळ नोव्हेंबर २०२७ पर्यंत संपणार आहे त्यामुळे लवकरच ग्रामपंचायत निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे.

सरपंच पदाचे आरक्षण जाहीर होताच चिचोली, भानेगाव, चनकापूर ग्रामपंचायत परिसरात राजकीय हालचालींना वेग आला आहे अनेक स्थानिक नेते, कार्यकर्ते गुडघ्याला बाशिंग बांधून मैदानात उतरले आहेत याबाबत सोशल मीडियावर जोरदार चर्चा आहे परंतु ऐन ग्रामपंचायत निवडणुकीच्या तोंडावर शासनाने संयुक्त नगरपरिषदेची घोषणा केली, तर या इच्छुकांच्या मेहनतीवर पूर्णपणे विरजन पडेल अशी भीतीही व्यक्त केली जात आहे.

### केंद्र सरकारच्या 'सीमा फ्रीज' नियमाचा मोठा फटका?

जनगणनेच्या पार्श्वभूमीवर ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी नवीन महसुली गावे, तालुके किंवा नगरपालिकांच्या सीमा निश्चित करण्याचे निर्देश केंद्र सरकारने राज्य व केंद्रीय शासित प्रदेशाना निर्देश दिले होते १ जानेवारी २०२६ पासून देशभरातील प्रशासकीय सीमा 'फ्रीज' करण्यात आल्या असून ३१ मार्च २०२७ पर्यंत या सीमांमध्ये कोणताही बदल करता येणार नसल्याचे म्हटले आहे त्यामुळे कायदेशीरदृष्ट्या ३१ मार्च २०२७ पर्यंत तूर्तास तरी संयुक्त नगरपरिषदेच्या निर्मितीला पूर्णपणे ब्रेक लागल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

## नवनाथ आश्रम तेलंगखेडी येथे ऋषीपंचमी निमित्त भाविकांची गर्दी

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर :** सावनेरपासून १५ किलोमीटर अंतरावर कोलार जलाशयाच्या काठी स्थापित नवनाथ आश्रमात



ऋषिपंचमीनिमित्त भाविकांनी प्रचंड गर्दी केली. यावेळी विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाली. भाविकांमध्ये महिला भाविकांची गर्दी जास्त होती. अनेक भाविकांनी नवनाथ मंदिर दत्त मंदिर गजानन मंदिर व महादेव मंदिरात पूजा केली. यावेळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्याच्या दृष्टीने आश्रमाचे पदाधिकारी वामन झोटिंग, अशोक हिवरकर, प्रवीण गिरडे, खुशाल घोटेकर, श्रेयस गिरडे, देवाजी उंबरे, अजय गिरडे, पोलीस पाटील रंजना हिवरकर, सरपंच प्रशांत देशमुख यांनी सहकार्य केले. यावेळी केळवत पोलीस स्टेशनतर्फे पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## फेसबुकवरील आक्षेपार्ह मजकुराप्रकरणी राहुल घाणेकर, विजय मोटघरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याविषयी फेसबुकवर आक्षेपार्ह मजकूर व कमेंट्स केल्याच्या आरोपावरून राहुल घाणेकर आणि विजय मोटघरे यांच्याविरोधात खापरखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सावनेर येथील राहुल घाणेकर यांच्या फेसबुक अकाऊंटवर १२ सप्टेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी आक्षेपार्ह मजकूर पोस्ट करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. संबंधित पोस्ट हटविण्याची विनंती काही नागरिकांनी केली होती. मात्र, पोस्ट हटविण्यात न आल्याने अखेर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. याच प्रकरणात विजय मोटघरे यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याविषयी आक्षेपार्ह कमेंट्स केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच संबंधित पोस्टवर अन्य काही व्यक्तींनीही महापुरुषांविषयी आक्षेपार्ह प्रतिक्रिया दिल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. या पोस्ट व कमेंट्सचे स्क्रीनशॉट घेण्यात आल्याचेही सांगण्यात आले.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष धीरज देशभ्रतार आणि सचिव सुमेध चौहान यांनी याप्रकरणी खापरखेडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदविल्याचे तक्रारदारांकडून सांगण्यात आले. सध्या गणेशोत्सव सुरू असून सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. अशा परिस्थितीत सोशल मीडियावर महापुरुषांविषयी आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करून सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होऊ नये, अशी भूमिका धीरज देशभ्रतार यांनी व्यक्त केली. दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. याबाबतचे निवेदन वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा यांना देण्यात आले. यावेळी प्रशांत पाटील, सुभाष नेताम, रमेश लांजेवार, मनोज बेरड, चक्रपाल पाटील, त्रिशरण कऱ्हाडे, राजेश गुढघे, विलास गेडाम, रवी शेंडे, हर्षद बनसोड, सुमेध इंगोले, सुमित बोरकर, सतीश वाघमारे, आशिष उके आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## उमरेड-भिवापूर महामार्गावरील खड्डे तत्काळ बुजवा, अन्यथा १६ सप्टेंबरला 'रास्ता रोको' आंदोलन

### शिवसेना शिंदे गटाचा प्रशासनाला इशारा

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
नागपूर-उमरेड-भिवापूर-नागभिड महामार्ग ३५३ डी या रस्त्यावरील उमरेड ते भिवापूर दरम्यान पडलेल्या जीवघेण्या खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. या महामार्गावरील खड्डे तातडीने न बुजवल्यास आणि मंजूर असलेले चौपदरीकरणाचे काम त्वरित सुरू न केल्यास १६ सप्टेंबर रोजी भिवापूर नाक्यावर तीव्र 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेना (शिंदे गट) उमरेड विधानसभा क्षेत्राचे सचिव दिलीप भिवाजी सोमाटक्के यांनी प्रशासनाला दिला आहे.

या संदर्भात राष्ट्रीय महामार्ग ३५३ डी चे प्रकल्प संचालक तसेच उमरेडचे उपविभागीय अधिकारी (महसूल) यांना निवेदन देण्यात आले आहे.

**भाऊ-बहिणीचा भीषण अपघातः**

निवेदनात नमूद केल्यानुसार, उमरेड ते भिवापूर हा २२ किलोमीटरचा महामार्ग खड्ड्यांमुळे वाहनचालकांसाठी अतिशय धोकादायक बनला आहे. १४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ८:३० वाजता उमरेड येथील भिवापूर नाक्याजवळ एका भीषण अपघातात भावाचा जागीच मृत्यू झाला, तर बहीण गंभीर जखमी असून तिच्यावर उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



**आंदोलनाचा इशारा**

उमरेड ते भिवापूर महामार्गावरील खड्ड्यांची दुरुस्ती आजच्या आज न झाल्यास १६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता अपघातस्थळी (भिवापूर नाका) हजारो नागरिकांच्या उपस्थितीत महामार्ग बंद आंदोलन करण्यात येईल.

या आंदोलनादरम्यान काही अनुचित प्रकार घडल्यास किंवा गालबोट लागल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असा स्पष्ट इशाराही या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या प्रसंगी शिवसेना तालुका प्रमुख अभिषेक नान्हे, युवासेना युवासेना उपजिल्हा प्रमुख मिथुन माटे, उमेश हटवार, सुजित कुरुटकर, प्रकाश कटारे, सुनिल चींचुलकर, महेश सदावर्ती, कोहिनूर वाघमारे उपस्थित होते.

## नोबेल विजेते कैलाश सत्यार्थी यांच्या हस्ते डॉ. उदय बोधनकर यांच्या 'Death-Defying Doctor'चे विमोचन

### संघर्ष, जिद्द, करुणा आणि मानवसेवेच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाची कहाणी

**दै. सिंहवाणी वृत्त, नवी दिल्ली**
नोबेल शांतता पुरस्काराने सन्मानित कैलाश सत्यार्थी यांच्या हस्ते प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ, बालआरोग्य व बालहक्कांचे प्रखर समर्थक डॉ. उदय बोधनकर यांच्या "Death-Defying Doctor – Inspirational Story" या प्रेरणादायी पुस्तकाचे नवी दिल्ली येथे औपचारिक विमोचन करण्यात आले. बालहक्क, बालसंरक्षण आणि बालमजुरी निर्मूलनासाठी जागतिक स्तरावर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कैलाश सत्यार्थी यांच्या गरिमामय उपस्थितीमुळे या सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

मुलांचे आरोग्य, सन्मान, सुरक्षितता आणि उज्ज्वल भविष्य हा त्यांच्या जीवनकार्याचा केंद्रबिंदू असून, हाच विचार डॉ. बोधनकर यांच्या पुस्तकाच्या मूलभूत संदेशाशीही घट्ट जोडलेला आहे. "Death-Defying Doctor – Inspirational Story" या पुस्तकात डॉ. उदय बोधनकर यांच्या असाधारण जीवनप्रवासाचे, संघर्षांचे, आव्हानांचे, ध्येयवादाचे आणि दृढनिश्चयाचे प्रेरणादायी चित्रण करण्यात आले आहे. गेल्या अनेक दशकांपासून बालआरोग्य, बालहक्क, किशोर आरोग्य, युवक विकास आणि मानवतावादी सेवा या क्षेत्रांत त्यांनी केलेल्या समर्पित कार्याची प्रभावी मांडणी या पुस्तकातून करण्यात आली आहे. हे पुस्तक केवळ एका चिकित्सकाच्या व्यावसायिक प्रवासाचे दस्तऐवजीकरण नाही, तर साहस, संघर्ष, करुणा, चिकाटी, सेवा आणि आशा यांची प्रेरणादायी कहाणी आहे.

कठीण परिस्थितींना दृढ इच्छाशक्ती आणि सकारात्मक दृष्टिकोनाच्या बळावर संधीमध्ये रूपांतरित करता येते, तसेच वैद्यकीय ज्ञानाची खरी सार्थकता मानवतेच्या सेवेतच आहे, हा महत्त्वपूर्ण संदेश पुस्तकातून देण्यात आला आहे. या प्रसंगी डॉ. उदय बोधनकर यांनी कैलाश सत्यार्थी यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. प्रत्येक मुलाला उत्तम आरोग्य, आनंद, सन्मान, सुरक्षितता आणि आपली पूर्ण क्षमता विकसित करण्याची समान संधी मिळाली पाहिजे, हा आपल्या जीवनप्रवासाचा मूलभूत विश्वास असल्याचे त्यांनी सांगितले. कैलाश सत्यार्थी यांच्यासारख्या




जागतिक स्तरावरील मानवतावादी व्यक्तिमत्त्वाच्या हस्ते पुस्तकाचे विमोचन होणे हा माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा आणि प्रेरणादायी क्षण आहे, असे डॉ. बोधनकर यांनी नमूद केले.

वंचित आणि दुर्बल घटकांतील मुलांच्या हक्कांसाठी श्री. सत्यार्थी यांनी केलेल्या दशकानुदशकांच्या संघर्षामुळे पुस्तकाच्या मूलभूत विचारांना विशेष बळ आणि व्यापकता प्राप्त झाली आहे. हे पुस्तक विशेषतः युवक, वैद्यकीय विद्यार्थी, आरोग्य क्षेत्रातील व्यावसायिक, चिकित्सक आणि समाजसेवकांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे. विपरीत परिस्थितींना धैर्याने सामोरे जात, ज्ञान आणि कौशल्याचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी कसा करता येतो, याची दिशा पुस्तकातून मिळते.

या महत्त्वपूर्ण भेटीचे आयोजन शक्य करण्यात ह्यहिंदुस्तानह्नचे सन्माननीय संपादक श्री. प्रताप सोमवंशी यांच्या वैयक्तिक प्रयत्नांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली. त्यांच्या सहकार्याबद्दल आणि या आत्मीय पुढाकाराबद्दल डॉ. उदय बोधनकर यांनी श्री. प्रताप सोमवंशी यांच्याप्रती विशेष कृतज्ञता व्यक्त केली. "Death-Defying Doctor – Inspirational Story" हे पुस्तक अखेरीस मानवी जिजीविषा, संघर्ष, जिद्द आणि सेवाभावाचा उत्सव आहे. विपरीत परिस्थितीचे सामर्थ्यात, ज्ञानाचे सेवेत आणि प्रेरणेचे विधायक कृतीत रूपांतर करण्याचा प्रेरणादायी संदेश हे पुस्तक समाजापुढे ठेवते.

थोडक्यात

## खापरखेड्यात श्री विश्वकर्मा जयंती पूजा समारोह गुरुवारी

### श्री राम मंदिर, पोलीस स्टेशनजवळ सकाळी ९ वाजता कार्यक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

दरवर्षीप्रमाणे यावषीर्ही श्री भगवान विश्वकर्मा जयंती निमित्त पूजा समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरूवारी, दि. १० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ०९.०० वाजता श्री राम मंदिर परिसर, पोलीस स्टेशनजवळ, खापरखेडा येथे हा भक्तिमय कार्यक्रम संपत्र होणार आहे. विश्वकर्मा भगवान हे सृष्टीचे दिव्य शिल्पकार, कारागीर, अभियंते व तंत्रज्ञानाचे आद्यगुरू मानले जातात, उद्योग, उद्योगधंदा, कार्यशाळा, यंत्रसामग्री तसेच सर्व प्रकारच्या कामकाजात सुरक्षितता, प्रगती आणि यश मिळावे यासाठी या दिवशी भाविक पूजा अर्चना करतात.

स्थानिक कारागीर, मजूर, मेकेनिक, वेल्डर, वाहन दुरूस्ती व्यवसायिक, हार्डवेअर व विविध व्यवसाय क्षेत्रांतील लोक मोठ्या संख्येने उपस्थित राहून पूजा अर्चना करणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे. कार्यक्रमाचे आयोजन कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन खापरखेडा यांनी केले असून, कार्यक्रमाच्या निमित्तांने सकाळी ९ वाजता हवन व पूजन होणार असून त्यानंतर दुपारी १२.०० ते ३.०० या वेळेत सर्व भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. तरी परिसरातील सर्व कारागीर, व्यवसाथिक व विश्वकर्मा भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजक कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन खापरखेडा यांनी केले आहे.

## अरुण महाजन यांच्यावरील कथित अन्यायाच्या निष्पक्ष चौकशीसाठी पत्रकार संघाची खासदारांकडे मागणी

### एसपींच्या बदलीसाठी पाठपुराव्याचे आश्वासन



**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

लोकमत समूहात काम करित असतांना पत्रकार अरुण महाजन यांच्यावर झालेल्या कथित अन्यायाबाबत निष्पक्ष चौकशी करून योग्य कार्यवाही करावी, या मागणीसाठी कन्हान मराठी पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी खासदारांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. पत्रकारांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे व त्यांना निर्भयपणे काम करता यावे, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

यावेळी नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांचा तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्याची बाब खासदारांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. त्यांच्या कार्यकाळाची आठवण करून देत नियमानुसार बदलीबाबत केंद्रीय गृह विभाग व महाराष्ट्र राज्य गृह विभागाकडे पत्रव्यवहार करून योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली. कार्यकाळानंतरही त्यांची जिल्ह्यातील नियुक्ती कायम राहिल्यास भविष्यातील तपासाच्या निष्पक्षतेवर प्रश्न निर्माण होऊ शकतात, अशी भूमिका पत्रकार संघाने मांडली.

पत्रकार संघाच्या मागणीची दखल घेत खासदारांनी संबंधित गृह विभागांकडे पत्र पाठवून नियमानुसार बदलीच्या कार्यवाहीसाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. तसेच निष्ठावंत व प्रामाणिक पत्रकारांच्या पाठीशी आपण सदैव उभे राहू, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. या प्रसंगी कन्हान मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष सूर्यभान फरकाडे, सचिव सतीश घारड व विवेक पाटील उपस्थित होते. अरुण महाजन यांच्यावरील प्रकरणात न्याय मिळावा आणि पत्रकारांच्या प्रश्नांवर निष्पक्ष कार्यवाही व्हावी, यासाठी पुढील काळातही पाठपुरावा करण्याचा निर्धार संघाने व्यक्त केला.

## पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती स्पर्धेचा उत्साहात समारोप



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

रोटरी क्लब ऑफ नागपूर साऊथ आणि द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), नागपूर स्थानिक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ रविवारी उत्साहात पार पडला. या स्पर्धेत शहरातील विविधा शाळा आणि महाविद्यालयांमधील सुमारे २५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत शाडू मातीपासून आकर्षक व पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारल्या.

या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाला उद्योजक विलास काळे प्रमुख पाहुणे म्हणून, द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), नागपूर स्थानिक केंद्राचे चेअरमन संदीप शिरखेडकर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. धनंजय पाठक यांच्या मार्गदर्शनात ही स्पर्धा घेण्यात आली. यावेळी रोटरी क्लब ऑफ नागपूर साऊथचे अध्यक्ष पुरुषोत्तम गायधने, सचिव संदीप मराठे, प्रकल्प संचालक मिलिंद पाठक तसेच आरसीएनएसचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसऐवजी शाडू मातीच्या मूर्तीचा वापर करावा, तसेच पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी सजावट आणि विसर्जनही पर्यावरणपूरक पद्धतीने करावे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# सावनेरमध्ये भरदिवसा सहा लाखाची ठकबाजी

### २ महिने उलटले तरी चोर मोकाटच, सीसीटीव्हीचा उपयोग काय?




**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर (प्रतिनिधी)**

सावनेर शहरात चोरट्यांचा धुमाकूळ सुरूच असून स्थानिक पोलिसांच्या निष्क्रियतेवर नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे. हकीकत अशी आहे की, दि. ०९ जुलै २०२६ रोजी दुपारी ३:०० वाजता फियार्दी नर्मदा धनराज भोंगा (वय ६०, रा. वॉर्ड क्र. १५, पहिलेपार, सावनेर) या ६० वर्षीय महिला पोलीस ठाण्यापासून अवघ्या १ किमी अंतरावर आलेल्या बाजारपेठ, सावनेर येथे गेल्या असता समोर दोन अनोळखी ठकबाजांनी बोलण्यात गुंतवून हातचलाखीने गळ्यातील सोने काढून घेतले.

तक्रारी नुसार नेहमी प्रमाणे तक्रारदार महीला शेतीचे सामान घेण्याकरीता सावनेर बाजारामध्ये गेली होती. दुकानातुन सामान घुऊन आपले घरी जात असता जनरलचे स्टोर्सचे दुकान समोर दोन अनोळखी इसमाने तक्रारदार महीलेला थांबवुन योगाचा क्लास कुठे आहे? असे विचारले असता तीने मला माहीत नाही असे ऊत्तर देत निमुपने आपल्या रस्त्याने निघाली. त्यांनी पुन्हा तीला आवाज दिला व म्हंटले की बाई तु विचारा मध्ये आहे तुझा एक मुलगा मेला तुज्या मध्ये महालक्ष्मीचा दोष आहे तुज्या नातुला पण काही न काही होणार तु अस कर गळ्यातील १) सोन्याची पंचाली पोत २) सोन्याची जुनी वापरती गहु मणी पोत ३) सोन्याचा गोप सोन्याचे दागीने हे सर्व काढुन माझे कडे दे व तु ८० पाऊल चाल व इकडे तिकडे पाहु नको. असे म्हणुन ती ८० पाऊले चालायला लागली ८० पाऊले चालुन झाल्यावर ती परत आली तेंव्हा ते दोन्ही अनोळखी इसम तिथे नव्हते. तीने आपल्या नातु अमन धणोले याला फोन करुन बोलावले त्याने पण त्या चोरांचा शोध घेतला पण ते दिसुन आले नाही. यावरून आपल्याला ठगवीण्यात आल्याचे लक्षात येताचसावनेर पोलीस स्टेशन गाठत तक्रार नोंदवली.

**सीसीटीव्हीत आरोपी कैद, तरीही आरोपी पोलिसांच्या हाती नाहीत !**

घटनेला ९ जुलै २०२६ पासून तब्बल २ महिने उलटून गेले आहेत. विशेष म्हणजे या प्रकरणातील आरोपी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झालेले असल्याचे सांगण्यात येत असतानाही, अद्याप आरोपींचा शोध लागलेला नाही. सीसीटीव्ही फुटेजसारखा महत्त्वाचा पुरावा उपलब्ध असताना आरोपी मोकाट का...? त्यांच्या ओळखीची खातरजमा करून त्यांना तातडीने ताब्यात घेण्यासाठी तपास यंत्रणेकडून काय पावले उचलली जात आहेत, असा सवाल उपस्थित होत आहे.

**सीसीटीव्ही कॅमेरे लावून उपयोग काय... ? पोलीस प्रशासनाला सवाल**

धक्कादायक बाब म्हणजे हे प्रकरण ७ व्या महिन्यात घडूनही आजपर्यंत एकही चोर पोलिसांच्या हाती लागलेला नाही. दुसरीकडे सावनेर चे सर्व सीसीटीव्ही सुरू असल्याची प्रेस नोट ग्रामिण पोलीसांनी जारी केली होती. मग चोर जर सापडत नसेल तर सीसीटीव्ही कॅमेरे लावून उपयोग काय? असा सवाल सावनेर चे नागरिक स्थानिक व नागपुर ग्रामीण पोलीस प्रशासनाला सवाल करीत आहे. सावनेर शहरात ही एकटी घटना नाही. गेल्या काही महिन्यांत शहरात अनेक ठिकाणी चोऱ्या, घरफोड्या आणि ठकबाजीच्या घटना वाढल्या आहेत.

प्रत्येक वेळी नागरिक सीसीटीव्ही फुटेज देतात, पण पोलिसांकडून 'तपास चालू आहे' यापलीकडे काहीच उत्तर मिळत नाही. लाखो रुपये खर्च करून शहरात सीसीटीव्ही लावायचे आणि गुन्हा घडल्यावर त्याचा तपासासाठी वापरच करायचा नाही, तर सीसीटीव्हीचा उपयोग काय?

पीडित महीलेने दि.०९ जुलै २०२६ रोजी १) पंचाली पोत वजन १० ग्राम २) निर्भीड सोन्याची जूनी वापरती गहु मणी पोत वजन १० ग्राम ३) सोन्याचा गोफ कि. २० ग्राम असा एकुण ४० ग्राम चा माल चोरी गेल्याची तक्रार सावनेर पोलीसात दिली. या सोन्याची आजची किंमत जवळपास ६ लाख ७ हजार रुपए आहे. सावनेर पोलीसांनी याबाबत ०६८९/२०२६, कलम बीएन एस ३१६ (२), ३१८(४), ३१९(१)' अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

**गुन्ह्यात घट आल्याचा आव**

या घटनेला दोन महीने उलटून गेली परूंतू अद्याप सावनेर पोलीसांच्या हाती चोर लागले नाही. दुसरीकडे नागपूर जिल्हा ग्रामिण पोलीस गुन्ह्यात घट झाल्याचा आव आणत आहे. प्रत्यक्षात वस्तुस्थिती वेगळी आहे.

वरील घटनेत, फसवणूक करणाऱ्यांनी पीडितेच्या गळ्यातून पांचाली, गव्हाच्या दाण्यांचे भांडे आणि एका हारासह अंदाजे ३८ ग्रॅम सोने चोरल्याचा दावा केला आहे. सोन्याची बाजारपेठेतील किंमत अंदाजे ६ लाख रुपये असूनही, सावनेर पोलिसांनी नोंदवलेल्या एफआयआरमध्ये त्या ३८ ग्रॅम सोन्याची किंमत केवळ ६८,००० रुपये नमूद केली आहे, जी तपास आणि कुतूहलाचा विषय आहे.

## आयपीओ ही सेबीच्या नियमांनुसार राबविली जाणारी शिस्तबद्ध बहुस्तरीय प्रक्रिया : सीएस अविनाश गंधेवार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांनी (एमएसएमई) भांडवली बाजारात प्रवेश करण्यापूर्वी कायदेशीर, आर्थिक आणि कार्यात्मक बाबींची सखोल तयारी करणे आवश्यक आहे. आयपीओ ही सेबीच्या नियमांनुसार राबविली जाणारी शिस्तबद्ध बहुस्तरीय प्रक्रिया आहे, असे मत आयपीओ सल्लागार तथा सीएस अविनाश गंधेवार यांनी व्यक्त केले. विदर्भ मॅनेजमेंट असोसिएशनतर्फे (व्हीएमए) चिटणवीस सेंटर, सिव्हिल लाइन्स, नागपूर येथे नुकतेच एमएसएमईसाठी आयपीओची तयारी - व्यवसाय आयपीओसाठी सज्ज आहे का? या विषयावर सत्र आयोजित करण्यात आले होते. यावेळी गंधेवार मार्गदर्शन करीत होते.



खासगी कंपनीने आयपीओ काढण्यापूर्वी सार्वजनिक कंपनीत रूपांतर करणे, संचालक मंडळ व भागधारकांच्या मंजुरीसह आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करणे आणि कंपनी निबंधकांकडे (आरओसी) आवश्यक कागदपत्रे दाखल करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. आयपीओपूर्वी आर्थिक विवरणपत्रे, कायदेशीर दायित्वे, बौद्धिक संपदा, मालकी हक्क, कॉर्पोरेट गव्हर्नन्स आणि अनुपालनाची सखोल तपासणी करावी, असे त्यांनी स्पष्ट केले. ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) हा आयपीओचा बायबल असून, त्यात गुंतवणूकदारांसाठी महत्त्वाची माहिती असते, असे गंधेवार म्हणाले.

आयपीओद्वारे विस्तारासाठी भांडवल उभारता येते. योग्य भांडवली रचना आणि नियोजनातून प्रवर्तकांना व्यवसायावरील नियंत्रण कायम ठेवता येते. पारदर्शकता, अनुपालन आणि गुंतवणूकदारांचा विश्वास महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले. सत्राचे समन्वयक शिवम खंडेलवाल होते.

## मुख्य अभियंता भूषण शिंदे यांची पॉवर फ्रंट संघटनेने घेतली सदिच्छा भेट

### शाल व वृक्षरोप देऊन स्वागत, कंत्राटी कामगारांच्या विविध प्रश्नांवर सकारात्मक चर्चा

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

औष्णिक वीज महानिर्मिती केंद्र, खापरखेडा येथे नव्याने नियुक्त झालेले मुख्य अभियंता भूषण शिंदे यांची पॉवर फ्रंट कंत्राटी कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवार, दि. ८ सप्टेंबर रोजी सदिच्छा भेट घेतली. यावेळी संघटनेतर्फे वृक्षरोप व शाल देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



या भेटीदरम्यान कंत्राटी कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांचे निवेदन मुख्य अभियंत्यांना देण्यात आले. यावर सकारात्मक चर्चा झाली. औष्णिक वीज केंद्रातील सर्व कंत्राटी कामगारांना दरमहा ७ ते १० तारखेच्या आत वेतन मिळावे, यासाठी मुख्य अभियंत्यांच्या स्वाक्षरीने परिपत्रक काढावे आणि वेळेत वेतन न देणाऱ्या कंत्राटदारांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. याबाबत कल्याण अधिकारी आनंद वाघमारे यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

तसेच कोल सॅम्पलिंग व जलशुद्धीकरण प्रकल्पातील कंत्राटी कामगारांच्या मूळ वेतनात १९ टक्के वाढ व १९ टक्के थकबाकी (एरियस) देण्याची मागणी करण्यात आली. हा लाभ कामगारांना लवकर मिळावा, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. कंत्राट संपलेल्या कंत्राटदारांबाबतही लवकर कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. O/S-II येथील कंत्राटी महिला कामगारांना मागील एक ते दोन वर्षांपासून तात्पुरते गेटपास दिले जात असल्याचा मुद्दा संघटनेने मांडला. संबंधित कामगारांना कायमस्वरूपी गेटपास देण्यासाठी पुढील प्रक्रिया सुरू करण्याची सूचना मुख्य अभियंत्यांनी अधिकाऱ्यांना केली. कामगारांच्या विविध प्रश्नांवर मुख्य अभियंत्यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याने प्रलंबित मागण्या मार्गी लागण्याची अपेक्षा संघटनेने व्यक्त केली.

यावेळी कल्याण अधिकारी आनंद वाघमारे, पॉवर फ्रंट कंत्राटी कामगार संघटनेचे राज्य सचिव रोशन गोस्वामी, विदर्भ अध्यक्ष भूपेंद्र चतुर्वेदी, शाखाध्यक्ष प्रवीण हाते, कोषाध्यक्ष अनिल बोरकडे, सचिव अभय गिरी, उपाध्यक्ष उमेश काळे, सुमेध चव्हाण, सहसचिव दिलीप गावंडे, नरेश डोंगरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## भरती प्रक्रियासंबंधी सूचना संदर्भात उच्चस्तरीय समितीची आज बैठक

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी तसेच परीक्षांमधील गैरप्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. समितीचे अध्यक्ष व सदस्य उद्या बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत नियोजन भवन, येथे या अनुषंगाने भेटणार आहेत. विद्यमान परीक्षा प्रणाली व विविध विभाग, प्राधिकरणे तसेच परीक्षा घेणाऱ्या संस्थांच्या कार्यपद्धतीचा आढावा, परीक्षा अधिक सुरक्षित, निष्पक्ष, पारदर्शक व उमेदवाराभिमुख करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून निकाल प्रक्रियेपर्यंतची सुरक्षा, प्रश्नपत्रिकेचे मॉडरेशन, डिजिटल अथवा मुद्रित वितरण, गोपनीय वाहतूक, परीक्षा केंद्रांचे व्यवस्थापन, प्रतिसाद नोंदणी आणि मूल्यांकन याबाबत सूचना मागविण्यात आल्या होत्या.

तसेच बायोमेट्रिक प्रमाणीकरण, प्रवेश नियंत्रण, ऑडिट ट्रेल्स आणि सीसीटीव्ही देखरेख यांसारख्या माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, पेपरफुटी, गोपनीयतेचा भंग, तोतया उमेदवार, संगनमत आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा गैरवापर रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय व उत्तरदायित्व निश्चित करणे याबाबतही अभिप्राय मागविण्यात आले आहेत. इतर राज्ये अथवा देशांतील यशस्वी व आधुनिक परीक्षा पद्धतींचा अभ्यास, परीक्षा केंद्रांसाठी किमान पायाभूत व सुरक्षा मानके, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस यंत्रणा, शिक्षण विभाग आणि परीक्षा संस्थांमधील समन्वय तसेच उमेदवारांसाठी जलद व पारदर्शक तक्रार निवारण प्रणाली याबाबतही सूचना मागविण्यात आल्या होत्या.

## बिनासंगम परिसरात बिबट्याचा धुमाकूळ कायम

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

बिनासंगम परिसरात मागील तीन दिवसांपासून बिबट्याच्या दहशतीने नागरिक व शेतकरी कमालीचे दहशतीखाली आहेत बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी वनविभागाने लावलेला पिंजरा हुकवत बिबट्याने एका कोठाच्या भिंतीला भगदाड पाडून बकरीच्या पिल्लाची शिकार केली शिवाय बकऱ्याच्या मानेला पंजा मारून गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी १५ सप्टेंबर सकाळी उघडकीस आली असून वनविभागाच्या अपुऱ्या नियोजनामुळेच बिबट्या जाळ्यात अडकला नसल्याचा आरोप संतप्त गावकऱ्यांकडून केला जात आहे.





बिबट्याचा वाढता धोका लक्षात घेता १४ सप्टेंबरच्या रात्री सेमेनरी हिल्स वनपरिक्षेत्राच्या पथकाने बिनासंगम शिवारात दोन पिंजरे लावले होते यातील एक पिंजरा नसीर अजित खान यांच्या शेतात बसवण्यात आला होता. बिबट्याला आकर्षित करण्यासाठी पिंजऱ्यात बिबट्यानेच आधी शिकार केलेल्या गाईचे वासरू ठेवण्यात आले होते.

मात्र बिबट्याने पिंजऱ्यातील त्या मृत वासराकडे साधी नजरही टाकली नाही उलट बिबट्याने रात्रीच्या सुमारास पिंजऱ्या जवळ असलेल्या कोठ्याच्या भिंतीला खड्डा पाडून एका बकरीच्या पिल्लाची शिकार केली यावेळी कोठ्यात बांधून आलेल्या बकऱ्याच्या मानेवर पंजा मारून गंभीर जखमी केले. मंगळवारी सकाळी घटना उघडकीस आल्यानंतर बिनासंगम परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.बिबट्याला जाळ्यात ओढण्यासाठी पिंजऱ्यात ताजे मांस किंवा एखादा गाय बकरी ठेवणे अपेक्षित होते. मात्र, वनविभागाने आधीच शिकार केलेले आणि दुर्गंधी सुटलेले वासरू पिंजऱ्यात ठेवले वासराचा कुजलेला वास

बिनासंगम ग्रामपंचायत सरपंच नारायण भडंग यांनी गावात दवंडी देऊन बिबट्याचा वावर असल्याने सायंकाळी ६ वाजेनंतर शेतात जाण्यास मनाई केली व गुरेढोरे शेतात बांधण्यास मनाई केली आहे.

### वनविभागाचा पिंजरा हुकवून बकरीच्या पिल्लाची शिकार!

आल्यानेच बिबट्याने पिंजऱ्याकडे पाठ फिरवली असण्याची दाट शक्यता जाणकारांनी व्यक्त केली आहे. मागील तीन दिवसांपासून बिबट्या वावर असल्याने शेतकरी रात्री-अपरात्री शेतात जाण्यास घाबरत आहेत वनविभागाने केवळ औपचारिक पिंजरे न लावता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, पिंजऱ्यात योग्य भक्ष्य ठेवून बिबट्याला त्वरित जेरबंद करावे अशी जोरदार मागणी बिनासंगम ग्रामस्थांनी केली आहे.

# दैनिक सिंहवाणी वृत्तचा 'आरती संग्रह' घरोघरी



दैनिक सिंहवाणी वृत्त 'आरती संग्रह-२०२६'चे विमोचन करताना काँग्रेस नेते गिरीश पांडव, युथ काँग्रेसचे कार्यकर्ते प्रणश ठाकुर, दै. सिंहवाणी वृत्तचे मुख्य संपादक अजय बिवडे, सह्याद्री फाउंडेशनचे व्यवस्थापक दिपक पसारकर, समन्वयक वैभव बागडे



दैनिक सिंहवाणी वृत्त 'आरती संग्रह-२०२६'चे विमोचन करताना दक्षिण नागपुरातील हरडे असोसिएट्सचे संचालक धनराज विठ्ठलरावजी हरडे व कार्यालयीन कर्मचारी

## 'बाप्पांच्या उत्सवाचा रंग, दैनिक सिंहवाणी वृत्त संग'



दैनिक सिंहवाणी वृत्तच्या उपक्रमात शिवनगर, नागपूर येथील रहिवासी रमेश लांजेवार, प्रतिक लांजेवार, संकल्प लांजेवार, अणिष्का लांजेवार व दर्शिका लांजेवार यांनी घरी विराजमान झालेल्या बाप्पांसोबत सहकुटुंब छायाचित्र पाठवून सहभाग नोंदविला.



किशोर गायकवाड, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर यांच्याकडील बाप्पा



सह्याद्री फाउंडेशन संचालित आस्था निवारागृह येथे उपस्थित प्रभुजींना दररोजच्या प्रार्थनेसाठी उपयुक्त आरती संग्रह वितरीत

# टॉवरवर चढलेल्या युवकाने रोखला प्रशासनाचा श्वास

## अग्निशमन विभागाने खाली उतरवून केले पोलिसांच्या हवाली

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
मंगळवारी सकाळी ११.४५ वाजता अग्निशमन विभागाच्या नियंत्रण कक्षास अहिंसा चौक, आमदार निवास लॉ कॉलेज रोड, नागपूर येथे टॉवरवर एक व्यक्ती चढल्याबाबत दूरध्वनीद्वारे माहिती प्राप्त झाली. प्राप्त माहितीनुसार सिव्हील अग्निशमन केंद्र येथून अग्निशमन वाहना सोबत अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. व सदर पथक ११.४९ वाजता घटनास्थळी पोहोचले.

घटनास्थळी पाहणी केली असता एक व्यक्ती टॉवरवर चढलेली असल्याचे निदर्शनास आले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन टीटीएलच्या सहाय्याने उप अग्निशमन अधिकारी श्री. मानके, श्री. राजूरकर, चा. यं. चा. श्री नयन पेठे, कं. अग्नि. वि. तसेच एका पोलीस कर्मचाऱ्यासह सदर व्यक्तीच्या बचावासाठी टॉवरच्या दिशेने रेस्क्यू ऑपरेशन सुरू करण्यात आले. रेस्क्यू पथक व्यक्तीच्या जवळ पोहोचण्याचा प्रयत्न करीत असताना सदर व्यक्ती खाली येण्यास नकार देत होती व पथक जवळ जाताच ती व्यक्ती टॉवरवरच्या वरच्या दिशेने वर चढत होते. टॉवरवरील वायरिंग व इतर अडथळ्यांमुळे ळळछ ची केज व्यक्तीच्या जवळ नेण्यात अडचणी निर्माण होत होत्या.

अशा प्रतिकूल परिस्थितीतही अग्निशमन अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अत्यंत संयमाने परिस्थिती हाताळत सदर व्यक्तीच्या जवळ पोहोचून तिला पाणी व नाश्ता देण्यात आला. तसेच त्याला विश्वासात घेऊन शांतपणे संवाद साधत खाली येण्यास प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, व्यक्ती खाली येण्यास तयार नव्हती.

त्यानंतर टीटीएल खाली आणून पुढील रेस्क्यू ऑपरेशनबाबत संपुर्ण टिम द्वारे आवश्यक नियोजन व रणनीती आखण्यात आली. नियोजनानुसार अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी पुन्हा टॉवरवर गेले.

यामध्ये टीटीएल च्या केजमधून एक अधिकारी व कर्मचारी टॉवरवर चढले, तसेच टॉवरवरच्या शिडीने एक कर्मचारी टॉवर वर चढला व असे तिन कर्मचाऱ्याने सदर व्यक्तीला पकडुन केज मध्ये टाकुन रेस्कयु करुन २.१८ वा. खाली आणण्यात यश आले.



सदर व्यक्तीचे नावकिशोर ऊर्फे मोनु बरसन सिंन्हा असून वय अंदाजे २० वर्ष आहे. हा युवक रा. बोरतारा पोस्ट तिरुर, तह. गुरुर बालोद, जिल्हा छत्तीसगड येथील रहिवासी आहे.

सदर व्यक्तीला रेस्क्यु करुन वरीष्ठ पोली निरीक्षक,अंबाझरी पोली स्टेशन व त्याची टिम यांच्या स्वाधिन करण्यात आले.

# धरमपेठ झोन अंतर्गत अनधिकृत फूटपाथवरील पाल शेड हटाओ कार्यवाही सुरू

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूर महानगरपालिका, धरमपेठ झोन क्र. ०२, अंतर्गत केलेल्या अतिक्रमण कारवाई गोकुळपेठ, अमरावती रोड, सेमिनरी हिल्स व झिरो माईल्स ते लोकमत चौक पर्यंत धरमपेठ झोन अंतर्गत या ठिकाणी कारवाई करण्यात आली. सदर कारवाई आयुक्त मनपा नागपूर, पोलीस आयुक्त नागपूर शहर, उपायुक्त वाहतुक, नागपूर यांच्या संयुक्तिक मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अतिक्रमण निर्मुलन कारवाई मधे धरमपेठ झोन चे सहाय्यक आयुक्त राजकुमार मेश्राम, अतिक्रमण पथक धरमपेठ झोन, एन.डी.एस अधिकारी व कर्मचारी संपूर्ण कार्यवाहीमध्ये उपस्थित होते. नागपूर महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाद्वारे गोकुळपेठ, अमरावती रोड, सेमिनरी हिल्स व झिरो माईल्स ते लोकमत चौक येथे धडक कारवाई करण्यात आली. सार्वजनिक रस्त्यावर उभारण्यात आलेले अनधिकृत शेड व तात्पुरती अतिक्रमण निष्कासित करून हा परिसर पूर्णपणे अतिक्रमणमुक्त करण्यात आला.

# गणेश मंडळाच्या माध्यमातून शासकीय योजनांच्या जनजागृतीसाठी लोकसंवाद अभियान

## माहिती व जनसंपर्क विभागाचा अभिनव उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**
महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील लोकसहभागाचा महत्त्वाचा उत्सव असलेल्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्यावतीने राज्यभर लोकसंवाद-२०२६ हा विशेष जनजागृती उपक्रम १६ ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत आहे.

राज्य शासनाने गणेशोत्सवाला राज्य महोत्सव म्हणून घोषित केले असून, या पार्श्वभूमीवर मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येणाऱ्या गणेश मंडळाच्या ठिकाणी लोकसंवाद कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. शासनाच्या योजनांची माहिती देण्याबरोबरच नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधणे, आणि पात्र लाभार्थ्यांना संबंधित योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करणे, हा लोकसंवाद-२०२६चा प्रमुख उद्देश आहे. या कार्यक्रमांच्या माध्यमातून विविध शासकीय विभागांच्या स्थानिक तसेच जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांशी नागरिकांना थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध होणार आहे. विविध योजनांची माहिती यावेळी देण्यात येणार आहे.

**विविध विभागांच्या योजनांची माहिती**

प्रत्येक जिल्ह्यातील प्रमुख व मानाच्या गणेशोत्सव मंडळांमध्ये लोकसंवाद कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे.

लोकसंवाद-२०२६मध्ये कृषी, महिला व बालविकास, शिक्षण, सामाजिक न्याय, सहकार, पणन, सार्वजनिक आरोग्य, कौशल्य विकास, क्रीडा व युवक कल्याण आदी विभागांसह सर्वच विभागांचा सहभाग असणार आहे. शेतकरी सन्मान निधी, पीक विमा, शेततळे, कृषी औजारांसाठी अनुदान, महिला बचत गट तसेच महिलांसाठी उच्च शिक्षणाच्या युवक आणि विद्यार्थ्यांसाठीच्या शिक्षण, कौशल्य विकास, शिष्यवृत्ती योजना सवलती यासह विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष यांसह मोफत तपासणी, औषधोपचार व शिष्यवृत्तीशी संबंधित सुविधांची माहिती देण्यात येणार आहे.

कौशल्य विकास क्षेत्रात कौशल्य विकास प्रशिक्षण, मुख्यमंत्री रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम, स्वयंरोजगार कर्ज योजना तसेच बार्टी, सारथी आणि महाज्योती आदी संस्थांच्या योजनांबाबत युवक व नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.याशिवाय महाडीबीटी, सायबर सुरक्षा, माहितीचा अधिकार, आणि आपले सरकार यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवरही जनजागृती करण्यात येणार आहे. प्रभावीपणे राबविण्यासाठी कृषी, आरोग्य, महिला व बालविकास, शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, सहकार, पणन, कौशल्य विकास, सामाजिक न्याय तसेच पोलीस विभागासह संबंधित यंत्रणांशी समन्वय साधण्यात येणार आहे.

